POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१३४ ● मुंबई, मंगळवार, १६ डिसेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## बिगुल वाजलं!

### मुंबईसह २९ महापालिकांची निवडणूक झाल्या जाहीर

**असा असेल निवडणुकीचा कार्यक्रम -**

- अर्ज दाखल करण्याचा कालावधी - २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर
- अर्जाची छाननी - ३१ डिसेंबर
- उमेदवारी माघारीची मुदत - २ जानेवारी २०२६
- निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम यादी - ३ जानेवारी २०२६
- मतदान - १५ जानेवारी २०२६
- मतमोजणी - १६ जानेवारी २०२६
- एकूण जागा - २८६९
- महिला - १४४२
- अनुसूचित जाती - ३४१
- अनुसूचित जमाती - ७७
- नागरिकांचा मागास प्रवर्ग - ७५९




■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुंबईसह २९ महापालिकांच्या निवडणुका अखेर जाहीर झाल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार, १५ जानेवारी २०२६ला मतदान होणार असून, १६ जानेवारीला निकाल लागणार आहे. आजपासून सर्व महापालिकांमध्ये आचारसंहित लागू करण्यात आल्याचं निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी जाहीर केलं आहे. नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीनंतर निवडणूक आयोग लगेचच पालिका निवडणुका जाहीर करेल असे अंदाज वर्तवले जात होते. दरम्यान पालिका निवडणुका जाहीर झाल्याने २१ जानेवारीला लागणाऱ्या निकालांना आता विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे.

**मुदत संपलेल्या पालिका :** ३१ जानेवारीच्या आधी निवडणुका घेण्यासंदभार्तील आदेश सुप्रीम कोर्टाने दिले होते. राज्यातील २९ महापालिकांपैकी २७ महापालिकांची मुदत संपली होती. ५ पालिकांची २०२० मध्येच मुदत संपली होती. तसंच मुंबईसह काही पालिकांची २०२२ मध्ये मुदत संपली होती. २०२३ मध्ये ४ पालिकांची मुदत संपली होती अशी माहिती निवडणूक आयुक्त दिशेन वाघमारे यांनी दिली. सहा महिन्यात जातवैधता सादर करण्याचे हमीपत्र द्यावं लागणार आहे. जातवैधता पत्र न देऊ शकणाऱ्यांची वैधता रद्द होईल. एकूण ३ कोटी ४८ लाख ७८ हजार १७ मतदार असणार आहेत अशी माहितीही त्यांनी दिली. मुंबई पालिकेसाठी १० हजार १११ मतदान केंद्र असणार आहेत. जी मतदारयादी वापरणार आहोत त्यासाठी १ जुलै २०२५ ही अधिसूचित यादी वापरली जाईल. ही मतदारयादी भारत निवडणूक आयोगाकडून घेतली असल्याने त्यात बदल करणे, डिलीट करण्याचा अधिकार आम्हाला नाही असं त्यांनी म्हटलं आहे. मतदारयादीतील संभाव्य दुबार मतदारांची ओळख पटली आहे. त्यांच्या नावासमोर डबल स्टार असेल. त्यांच्या घरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आलं आहे. तसंच तो कोणत्या मतदार केंद्रावर मतदान करणार आहे यासंदर्भात विचारलं आहे. त्यांना तिथेच मतदान करण्याची परवानगी दिलं जाईल. ज्यांनी उत्तर दिलेलं नाही त्यांच्याकडून हमीपत्र घेतलं जाईल. स्टार कॅम्पेनरची संख्या २० वरुन ४० करण्यात आली आहे. मताधिकार मोबाईल ॲपच्या माध्यमातून नाव, प्रभाग आणि मतदान केंद्र याची माहिती मिळेल. हे ॲड्रॉइवर असून, आयओएसवरही आणलं जाणार आहे.

**निवडणूक अधिकारी ठरले :** राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांनी महापालिकांना निवडणूक अधिकारी आणि सहायक अधिकारी उपलब्ध करून द्यावेत, असा आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिला होता. त्यानुसार या अधिकाऱ्यांची नावे निश्चित करण्यात आली आहेत.

## पुण्यात आणखी १ पुणे! २३ गावांचा विकास

### एक दोन नव्हे तर १५ मोठ्या एकात्मिक टाउन प्लॅनिंग योजना

पुणे महानगरपालिकेने २३ गावांसाठी विकास आराखडा तयार करावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. पुणे महानगरपालिकेने २०२१ मध्ये महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या २३ गावांसाठी विकास आराखडा तयार करावा. पुणे ग्रोथ हबसाठी सरकारच्या मित्र संघटनेकडून विकास आराखडा तयार करण्याची शक्यता पडताळली पाहिजे. पुण्यातीस टाउनशिप योजना कोणत्याही विलंबाशिवाय पूर्ण केल्या पाहिजेत असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. पुणे शहरातील मान-म्हाळुंगे टाउनशिप प्लॅनिंग योजना जलदगतीने पूर्ण करण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. शहरात १५ एकात्मिक टाउन प्लॅनिंग योजना सुरू आहेत. यासाठी अंतिम मुदती निश्चित कराव्यात असे आवाहनही त्यांनी केले. हे प्रकल्प विलंब न करता पूर्ण करावेत जेणेकरून सर्वांना त्यांचा वेळेवर फायदा होईल. आतापर्यंत, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडीए) २०२१ मध्ये पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये बांधकाम परवानग्या देण्याचे अधिकार होते. गुरुवारी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पीएमआरडीएच्या बैठकीत या २३ गावांमधील बांधकाम परवानग्यांचे अधिकार महापालिकेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे परवानग्या देणे आणि विकास प्रकल्पांचे नियोजन करणे अधिक सोयीस्कर होईल.

■पुणे। प्रतिनिधी,

मुंबईला पर्याय म्हणून नवी मुंबई उभारण्यात आली. यानंतर आता मुंबई आणि नवी मुंबईला पर्याय म्हणून तिसरी आणि चौथी मुंबई उभारण्याची मोठी घोषणा करण्यात आली आहे. मुंबई प्रमाणेच पुणे शहर देखील झपाट्याने विकसीत होत असलेले शहर आहे. अनेक मोठ्या औद्योगीक वसाहती, कळ हब तसेच व्यापारी संकुले यामुळे पुणे शहरावरील ताण वाढत आहे. यामुळेच मुंबई आणि नवी मुंबई प्रमाणे पुण्यात आणखी एक पुणे उभे उभारण्याची योजना आहे. पुणे महानगरपालिका हद्दीत सामील होणाऱ्या २३ गावांचा विकास होणार आहे. यासह एक दोन नाही तर १५ मोठ्या एकात्मिक टाउन प्लॅनिंग योजना जलद गतीने पूर्ण केल्या जाणार आहेत. यामुळे पुणे शहरात उत्तम दर्जाच्या नागरी सोई सुविधा मिळणार आहे.

राज्य सरकारने महानगरपालिका हद्दीतील २३ गावांमध्ये बांधकाम परवानग्या देण्याचे अधिकार पीएमआरडीएला दिले होते. गावांसाठी विकास आराखडे तयार करण्याचे काम पीएमआरडीएमार्फत आधीच केले जात होते, त्यामुळे पीएमआरडीएला गावांमध्ये बांधकाम परवानग्या देण्याचा अधिकारही होता. बांधकाम परवानग्यांमधून मिळणारा महसूलही पीएमआरडीएकडे जात असे. त्याच वेळी, महानगरपालिकेला महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या गावांमध्ये पायाभूत सुविधांवर खर्च करावा लागत असे.

२०२२ मध्ये, गावांमध्ये बांधकाम परवानग्यांमधून मिळणाऱ्या महसुलाचा वाटा महानगरपालिकेला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता, परंतु महानगरपालिकेला अद्याप ही रक्कम पूर्णपणे मिळालेली नाही. याचे




प्रतिकूल परिणाम महानगरपालिका आणि संबंधित भागातील नागरिकांना भोगावे लागत होते. गावांमध्ये बांधकाम परवानग्या देण्याचा अधिकार पीएमआरडीएकडे होता, तर नागरिकांना सुविधा पुरवण्याची जबाबदारी महानगरपालिकेची होती. यामुळे दोन्ही प्रशासनांमध्ये सतत तणाव निर्माण झाला आहे.

विशेषतः, पीएमआरडीए पाणी, रस्ते, ड्रेनेज लाईन्स आणि पावसाळी पाण्याच्या गटारांची तपासणी न करता बांधकाम परवानग्या देत होते. यामुळे फ्लॅट खरेदीदारांना मूलभूत सुविधांचा अभाव होता. या सुविधांच्या अभावामुळे नागरिकांकडून महानगरपालिका प्रशासनावर टीका होत आहे. परिणामी, वाघोली आणि इतर भागांच्या अलिकडेच केलेल्या पाहणीनंतर, महानगरपालिका आयुक्तांनी पीएमआरडीए प्रशासनाला मूलभूत सुविधा उपलब्ध होईपर्यंत समाविष्ट गावांमध्ये बांधकाम परवानग्या देऊ नयेत अशी विनंती केली.

दरम्यान, स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना बांधकाम परवानग्या देण्याची जबाबदारी महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याची विनंती केली. पवार यांनी जलद निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. त्याच अंतर्गत, गुरुवारी नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या पीएमआरडीएच्या बैठकीत महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या २३ गावांमधील बांधकाम कामांचे अधिकार महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याचे आदेश देण्यात आले.

महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या २३ गावांमध्ये रस्ते, पाणी आणि ड्रेनेज लाईन यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असूनही मोठ्या प्रमाणात बांधकाम परवानग्या देण्यात आल्या आहेत. त्यामुळे तेथे मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. आता, महानगरपालिकेला परवानग्या देण्याचा अधिकार असेल. ज्या भागात वरील सुविधांचा अजूनही अभाव आहे, तेथे बांधकाम परवानग्यांचा पुनर्विचार केला जाईल. मूलभूत सुविधांचा आढावा घेतल्यानंतरच बांधकाम परवानग्या दिल्या जातील असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.


## शालेय अभ्यासक्रमात छत्रपतींचा इतिहास अवघ्या ६८ शब्दात संपवला... विधान परिषदेत गदारोळ!

■मिरारोड। प्रतिनिधी,

महाराष्ट्र विधान परिषदेत स्वतंत्र आमदार सत्यजित तांबे यांनी सीबीएसईच्या शालेय अभ्यासक्रमातील एका चुकीवर बोट ठेवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी आणि व्यापक इतिहासाला फक्त 68 शब्दांत मोजलं गेलय, असा आक्षेप त्यांनी घेतला. हा अभ्यासक्रम राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद म्हणजेच एनसीईआरटीने तयार केलाय. यातून राज्याच्या शिक्षण व्यवस्थेची पायाभूत कमजोरी दिसते असे ते म्हणाले. काय आहे प्रकरण? सविस्तर जाणून घेऊया.

**महाराजांच्या इतिहासाचे संक्षिप्तीकरण**

शिवाजी महाराजांनी विविध जाती-जमातींना एकत्र बांधून स्वराज्याची स्थापना केली. आई जिजाबाई आणि वडील शाहजी यांचे स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात उतरवले. मात्र या महान व्यक्तिमत्त्वाचा इतिहास फक्त ६८ शब्दांत सांगितला गेलाय, यावर आक्षेप नोंदवण्यात आला. इतर छोट्या राजवटींना पुस्तकात तुलनेत जास्त जागा मिळाली. तर महाराष्ट्राच्या अभिमानाचा साक्षात्कार असलेल्या शिवरायांचा इतिहास दुर्लक्षित झाल्याचे, यावेळी स्पष्ट करण्यात आले.



**आमदारांकडून संतप्त प्रतिक्रिया**

तांबे यांच्या मुद्द्याला सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील अनेक आमदारांनी पाठिंबा दिला. विधानसभेत हा विषय उपस्थित झाल्यावर सर्वत्र रोष व्यक्त झाला. जर शिवाजी महाराजांचा इतिहास देशभरातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसेल, तर राज्य शिक्षण विभागाची जबाबदारी काय? असा प्रश्न सर्वपक्षीय आमदारांनी उपस्थित केला. या संक्षिप्त वर्णनामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार नसल्याचे ते म्हणाले.

**सरकारची भूमिका काय?**

तांबे यांनी नोंदवलेल्या आक्षेपाला शिक्षणमंत्री डॉ. पंकज भोयार यांनी उत्तर दिले. राज्य शिक्षण आयोगाला एनसीईआरटी अभ्यासक्रमात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. तरीही महाराष्ट्र सरकारने संबंधित माहिती एनसीईआरटीला पाठवली आहे. भविष्यातही प्रयत्न सुरू ठेवले जातील, असे ते म्हणाले. तांबे यांनी या विषयावर अर्धा तास चर्चेसाठी मागणी केली, ज्यामुळे वाद आणखी तापला.

विधान परिषदेत तांबे यांनी हा मुद्दा उपस्थित केला आणि राज्य सरकारकडून सीबीएसईला यात हस्तक्षेप करण्याची मागणी केली. इतर आमदारांनीही सहमती दर्शवली, ज्यामुळे चर्चा तीव्र झाली. मात्र कोणत्याही स्थगनासारखी घटना घडली नाही; उलट, हा विषय शिक्षण धोरणातील त्रुटींवर प्रकाश टाकणारा ठरला. आमदारांनी विद्यार्थ्यांसाठी शिवरायांचा पूर्ण इतिहास समाविष्ट करण्याची मागणी केली.

## त्या शाळेवर अखेर शिक्षण अधिकाऱ्यांची कारवाई

■विरार। प्रतिनिधी,




वसईच्या सातिवली येथे शाळेत उठाबशा काढण्याची शिक्षा केल्याने विद्यार्थिनीचा मृत्यू झाला होता.याप्रकरणी वसईतील श्रीमती मनरादेवी एज्युकेशन संस्था आझाद वाडी दामू नगर कांदिवली पूर्व मुंबई संचालित श्री हनुमंत विद्यामंदिर शाळा कुवरापाडा सातीवली पूर्व केंद्र वालीवच्या इंग्रजी आणि हिंदी माध्यमांच्या शाळांची मान्यता शिक्षण विभागाने रद्द केली आहे. यामुळे शिक्षण व्यवस्थेत मोठी खळबळ माजली आहे. वसईच्या सातिवली येथील श्री हनुमंत विद्यामंदिर शाळेतील महिला शिक्षिकेने उशिरा शाळेत आल्याने १३ वर्षीय विद्यार्थिनीला दप्तरासह १०० उठाबशाची शिक्षा दिल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना १४ नोव्हेंबर रोजी घडली होती. या प्रकरणाच्या चौकशीअंती १३ डिसेंबर रोजी शाळेवर कारवाई करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत उल्लंघन, शैक्षणिक दजार्तील त्रुटी आणि शिक्षण हक्क कायद्याचे पालन न केल्याचे आढळून आले होते. महत्वाची बाब म्हणजे या शाळेमध्ये नववी आणि दहावीचा वर्ग अवैधरित्या सुरू होता. ही माहिती शिक्षण अधिकाऱ्यांच्या चौकशी दरम्यान समोर आली. यानंतर शाळा व्यवस्थापकाने जवळच्याच शाळेमध्ये हे दोन वर्ग स्थलांतरित केले आहेत. चौकशी अहवालानुसार, शिक्षण हक्क कायद्याच्या कलम १७ अंतर्गत शारीरिक शिक्षा पूर्णतः प्रतिबंधित असतानाही शिक्षकाने विद्यार्थिनीला शारीरिक शिक्षा दिली. या घटनेमुळे विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याचा आरोप असून, हे बाल संरक्षण कायद्यांचे गंभीर उल्लंघन मानले गेले आहे. तसेच, दोन्ही शाळांमधील अनेक शिक्षकांकडे आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता नसल्याचेही उघड झाले होते. या प्रकरणी गटशिक्षणाधिकारी पांडुरंग गलांगे, विस्तार अधिकारी राजेंद्र उबाळे, केंद्र प्रमुख कैलास चव्हाण यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे.

## बलात्कार झाल्यानंतर मुलीने भितीपोटी शिक्षण थांबवलं

### बीडमधील धक्कादायक प्रकार... नेमकं काय घडलं?

■पुणे। प्रतिनिधी,

बीडमध्ये सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली असून, या घटनेनंतर पीडित मुलीच्या पालकांनी भीतीमुळे तिचे शिक्षण बंद केले आहे. अलीकडेच मालेगाव आणि शिरूर येथील अशाच प्रकरणांनी समाज हादरला असताना बीडमधील ही घटना पुन्हा एकदा मुलींच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करते.


**बालकल्याण समितीकडे नेण्यात विलंब**

घटना घडून १४ दिवस उलटूनही पीडितेला बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले नव्हते, ही बाब गंभीर मानली जात आहे. समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनी अल्पवयीन पीडितेला २४ तासांत समितीकडे आणणे बंधनकारक असल्याचे सांगितले. अशा वेळी मुलीला मानसिक आधार, संरक्षण आणि त्वरित समुपदेशन आवश्यक असते, जे वेळेत केले असते तर मुलीचा मानसिक ताण कमी झाला असता, असे तज्ज्ञांचे मत आहे.

**पोलिसांकडून माहिती न मिळण्याची तक्रार**

पीडितेच्या आईने कोणती कलमे वाढवण्यात आली याची लेखी माहिती मिळावी म्हणून दोन दिवस पोलिस अधीक्षक कार्यालयात चकरा मारल्या. बालहक्क कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांच्या उपस्थितीत उपअधीक्षक पवार यांची भेटही घेण्यात आली. मात्र लेखी पत्र न मिळाल्याने आईने नाराजी व्यक्त केली. याआधीही शिरूर तालुक्यातील साडेसहा वर्षांच्या मुलीच्या प्रकरणात पोलिसांकडून योग्य सहकार्य न मिळाल्याची तक्रार प्रलंबित आहे. त्यामुळे पोलिसांकडून संवेदनशील प्रकरणांच्या हाताळणीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

अल्पवयीन मुलांवरील अत्याचाराच्या घटना समोर आल्यावर तातडीने तक्रार नोंदवणे, पीडितेला २४ तासांच्या आत बालकल्याण समितीकडे नेणे आणि तिचे समुपदेशन करणे अत्यावश्यक असते. अशा प्रकरणांमध्ये पोलिस, कुटुंब आणि बालहक्क यंत्रणा संवेदनशीलतेने भूमिका निभावणे गरजेचे आहे. पालकांनी मुलांच्या वागणुकीतील बदल ओळखून त्यांच्याशी खुला संवाद ठेवला पाहिजे. अत्याचाराचा सामना करणाऱ्या प्रत्येक मुलाला योग्य संरक्षण, मानसिक आधार आणि न्याय मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.



**नेमकं काय घडलं?**

५ नोव्हेंबर रोजी पीडितेची आई कामानिमित्त बाहेर गेल्यानंतर मुलगी खेळत होती. आई परतल्यावर ती घरातून गायब असल्याचे दिसले. त्यामुळे शिवाजीनगर पोलिस ठाण्यात अपहरणाची तक्रार नोंदवण्यात आली. नंतर मुलगी मामाकडे गेल्याचे समजल्याने हा गुन्हा निकाली काढण्याची प्रक्रिया सुरू झाली. २२ नोव्हेंबर रोजी या संदर्भात पत्रही पाठवण्यात आले होते. परंतु २६ नोव्हेंबरला परिस्थिती बदलली. मुलगी थेट पोलिस अधीक्षक कार्यालयात पोहोचली आणि तिच्यावर बलात्कार झाल्याचे धाडसाने सांगितले. तिने ओळखीचा सूरजकुमार धोंडीराम खांड (२२, रा. म्हाळसजवळा) याने तिच्यावर जबरदस्ती केल्याचे सांगितले. तक्रारीच्या आधारे अपहरणाच्या गुन्ह्यात पोक्सो व ॲट्रॉसिटीची कलमे वाढवण्यात आली. आरोपीला तीत्काळ अटक करण्यात येऊन तो न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आला आहे.

## फायनान्स कंपनीच्या रिकव्हरी एजंटला पोत्यात बांधून जिवंत जाळले

### यूपी, बिहार नाही तर महाराष्ट्रातील धक्कादायक घटना

■पुणे। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात एक अत्यंत खळबळजनक घटना घडली आहे. औसा तहसील अंतर्गत येणाऱ्या वानवाडा रोडवर एका व्यक्तीला पोत्यात बांधून हे पोत कारमध्ये टाकून जिवंत जाळून मारण्यात आले आहे. या अमानुष हत्याकांडामुळे एकच खळबळ उडाली आहे. मृत व्यक्ती हा एका फायनान्स कंपनीच्या रिकव्हरी एजंट असल्याचे समजते.



१४ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेने औसा तालुका आणि लातूर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. सुनियोजित कट रचून फायनान्स कंपनीच्या रिकव्हरी एजंटची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली आहे. या घनेमुळे कायदा आणि सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, या घटनेतील मृत व्यक्तीचे नाव गणेश चव्हाण असे आहे. तो एका फायनान्स कंपनीत रिकव्हरी एजंट म्हणून काम करत होता. गणेश चव्हाण यांना प्रथम पोत्यात बांधण्यात आले, नंतर कारमध्ये भरण्यात आले आणि नंतर आग लावण्यात आली, असा आरोप आहे. आग इतकी भीषण होती की गाडी पूर्णपणे जळून खाक झाली आणि आत असलेल्या व्यक्तीचा जागीच दुदैर्वी मृत्यू झाला. मृतदेह इतका खराब अवस्थेत होता की त्याची ओळख पटवणे अत्यंत कठीण होते, अनेक वेळ ही आग धुमसत होती.

या घटनेची माहिती मिळताच औसा पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला, परंतु तोपर्यंत आगीचा भडका उडाला होते. मृतदेहाची गंभीर स्थिती पाहता, घटनास्थळी पंचनामा करण्यात आला आणि शवविच्छेदन पूर्ण केल्यानंतर, मृतदेह कुटुंबाला देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.


तपासादरम्यान, घटनास्थळी आढळलेली जळालेली कार हा एक महत्त्वाचा पुरावा ठरली. पोलिसांनी कारच्या नंबर प्लेटच्या आधारे अधिक तपास केला, ज्यावरून हे वाहन औसा तांडा परिसरातील असल्याचे पुष्टी झाली. त्यानंतर, पोलिस पथक पहाटे ३:३० च्या सुमारास औसा तांडा येथे पोहोचले आणि वाहन मालक आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांची चौकशी केली, ज्यामुळे मृताची ओळख पटली. गणेश चव्हाण यांच्या हत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

आर्थिक व्यवहार, खंडणीचे वाद किंवा सखोल गुन्हेगारी कट या दृष्टिकोनातून पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत. सुरुवातीला पोलिसांना संशय आहे की ही हत्या अपघाती नसून सुनियोजित कट आहे. औसा पोलिस ठाण्याचे अधिकारी या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत आणि आरोपींचा शोध घेण्यासाठी एक विशेष पथक तयार केले जाण्याची अपेक्षा आहे. या भयानक घटनेनंतर औसा तालुक्यात दहशतीचे वातावरण पसरले आहे आणि स्थानिक रहिवासी तीव्र संताप आणि भीती व्यक्त करत आहेत.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# पर्यावरणाच्या मुळावर विकास!



**वातावरणीय बदल आणि प्रदूषणाच्या वाढत्या परिणामामुळे झाडांची लागवड आणि संवर्धन आता काळाची गरज बनली आहे, परंतु विविध प्रकल्पांच्या नावाखाली झाडांचा बळी दिला जात आहे. पर्यावरण राखताना विकास साधणे हेच खरे आव्हान आहे.**

निसगार्चा समतोल ढासळत चाललेला असताना, झाडांची लागवड करणे ही आजची सर्वात तातडीची गरज आहे. हवामानबदल, उष्णतेच्या लाटा, धुळीची पातळी, भूजलपातळीतील घसरण या सर्वांचे मूळ कारण म्हणजे अनियंत्रित जंगलतोड आणि नगर रचनेतील 'कॉंक्रीट'ची चुकीची संकल्पना. नाशिकमधील तपोवन परिसरातील झाडांच्या कत्तली विरोधातील संघर्ष व्यापक समस्येचे ताजे उदाहरण आहे. जनतेचा जोरदार विरोध, पर्यावरणवादींचे आंदोलन आणि युवकांचा स्वयंस्फूतीर्ने घेतलेला वाढता सहभाग लक्षात घेता लोकांमध्ये सुरु केलेल्या जनजागृतीचा प्रभाव पडत आहे. मात्र सत्ताधारी व विरोधक पर्यावरणाच्या प्रश्नावर केवळ घोषणांपलीकडे जात नाहीत. तपोवन येथील झाडांची तोड होणार याला लोकांनी प्रचंड विरोध केला. मात्र त्याठिकाणी झाडेच नव्हती, मोकळी जागा होती. तेथे नाशिक महानगरपालिका प्रशासनाने झाडांची लागवड केली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच गरज तेवढीच झाडे तोडणार याचा अर्थ स्पष्ट होतो की, झाडांचा बळी दिला जाणार. फक्त आता लोकांचा विरोध लक्षात घेता राज्य सरकारने मवाळ भूमिका घेतली आहे. परंतु विकासाच्या नावाखाली तपोवन येथील शेकडो झाडे तोडण्याची प्रक्रिया हळुवार सुरु केली. शहराचा विकास होत असताना वाहतूक व्यवस्था, रस्ते, पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. परंतु झाडे नष्ट करून केलेला विकास पुढील पिढ्यांसाठी विनाशाचे कारण ठरणार हेही तितकेच खरे. पर्यावरणाच्या रक्षणाची जबाबदारी केवळ शासनाची नाही. राज्यातील प्रत्येक नागरिकाची ही सामूहिक जबाबदारी आहे. झाडे तोडली जातात तेव्हा फक्त सोशल मीडियावर पोस्ट करून कर्तव्य संपत नाही. झाडे तोडण्यास विरोध करणे, याचिका दाखल करणे, पर्यावरणीय परवानग्या तपासणे, स्थानिक प्रतिनिधींवर दबाव टाकणे, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर झाडांची लागवड करून ती जतन करणे हे नागरिक म्हणून आपलेही कर्तव्य आहे. झाड लावणे सोपे आहे, पण ते जतन करणे कठीण. तपोवनचे आंदोलन हे एका जागृतीचे प्रतीक आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाची कत्तल होणार असेल तर जनता शांत बसणार नाही, असा स्पष्ट संदेश दिला गेला आहे. सत्ताधारी आणि विरोधकांनी पर्यावरणविषयक निर्णय घेताना राजकीय फायद्यापेक्षा दीर्घकालीन पर्यावरणीय समतोलाला प्राधान्य दिले पाहिजे. अन्यथा आजची ही झाडांची कत्तल उद्याच्या विनाशकारी परिस्थितीला आमंत्रण देणारी ठरणार, यात दुमत नाही. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत टाचणी पडली तरी त्याची जगभरात चर्चा होते. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईचा विकास झपाट्याने होत आहे. कोस्टल रोड, भूमिगत मेट्रो, बुलेट ट्रेन, तर भविष्यात नरिमन पॉइंट, विरार- अलिबाग- अटल सेतूमार्गे मुंबई अशी वाहतूक सेवा सुरु होण्याचे संकेत दिले आहेत. कमी वेळेत अधिकचा प्रवास चांगली गोष्ट आहे. मात्र या सगळ्यांत किती झाडांचा बळी दिला जाणार याबाबत एक शब्द कोणी बोलत नाही. मुंबईत २९ लाख झाडांची हिरवळ ही ओरड अनेक वर्षांपासून कानी पडत आहे. याचा अर्थ मुंबईतील झाडांची संख्या कमी झाली किंवा झाडांची लागवड केलीच नाही. देशातील परिस्थिती बघितली तर पर्यावरणसारख्या प्रमुख मागणीवर सरकारदेखील गांभीयार्ने घेत नाही. प्रदूषणास कारणीभूत प्लास्टिक बंदी आजही कागदावरच. मुंबईतील नद्यांना नाल्याचे स्वरुप प्राप्त झाल्याने प्रदूषणात वाढ होत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यात सरकार असो वा संबंधित यंत्रणा अपयशी ठरत आहे. विकासाच्या नावाखाली झाडांची कत्तल अशीच सुरु राहिली तर मात्र मृत्यूच्या दिशेने वाटचाल ही धोक्याची घंटा आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. सत्ताधारी आणि विरोधक-दोघांनाही आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. सत्तेत असताना 'हरित महाराष्ट्र', 'ग्रीन सिटी', 'इको-अर्बनायझेशन' यांसारख्या घोषणा दिल्या; पण प्रत्यक्षात पर्यावरणीय परिणाम, अहवाल न पाहता प्रकल्प मंजूर केले जातात. विरोधकही आंदोलनापुरते बोलतात; परंतु सत्ता मिळाल्यानंतर तेच निर्णय पुढे नेतात. म्हणजेच पर्यावरण हा राजकीय सोयीसाठी वापरला जाणारा मुद्दा झाला आहे. दीर्घकालीन धोरणांच्या दृष्टीने सत्ताधारी व विरोधक दोन्ही बाजू अपयशी ठरताना दिसतात. हवामान रक्षण, पाणी टंचाई कमी करणे, स्वच्छ हवा आणि आरोग्यपूर्ण समाज या सर्व गोष्टींचे मूळ एकच आहे-झाडे. म्हणूनच, झाडांची लागवड करणे ही फक्त घोषणा नाही, तर काळाची गरज आहे. वातावरणीय बदलामुळे गेल्या काही वर्षांत पाऊस लहरी झाला आहे. कधी उन तर कधी पाऊस. ऐन पावसाळ्यात वरुणराजाची दांडी ही महाराष्ट्रासाठी चिंतेची बाब आहे. पाणी हे अनमोल असून पाण्याची आजची बचत उद्याची गरज ठरणार आहे. पावसाने पाठ फिरवली तर जल बिन मच्छली तशी माणसाची अवस्था होण्यास वेळ लागणार नाही. त्यात महाराष्ट्रात जलस्रोत मर्यादित असून नवीन जलस्रोत निर्माण करणे तूर्तास तरी शक्य नाही. पाणी जिरवा पाणी वाचवा ही फक्त ओरडच, प्रत्यक्षात अंमलबजावणी कागदावरच. पाऊस ही सगळ्यांची गरजच आहे. परंतु वेळेत न येणे, अपेक्षेपेक्षा कमी बरसणे याला तुम्ही आम्ही जबाबदार आहोत. त्यामुळे भविष्यात पाण्याची चिंता मिटवण्यासाठी पाण्याची बचत करण्यासह नद्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

# कोकणचा हापूस जगात भारी!



'हापूस आंबा' कोकणचाच राहिला पाहिजे. त्यासाठी जे काही करावे लागेल त्याची मानसिक तयारी पाहिजे. केंद्रिय स्तरावर माजी केंद्रिय मंत्री खासदार नारायण राणे निश्चितपणे आवश्यक असणारे प्रयत्न करतील यात शंका नाही; परंतु कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी, तज्ञांनी यावर बोलण्याची आवश्यकता आहे. हापूसच्या दबावगटाचे वातावरण निर्माण झाल्याशिवाय आंबा बागायतदारांमध्ये जागरूकता येणार नाही. आम्हाला काय करायचय, आमचं काय आहे त्यात, नुकसान झाल, तर आमचं कुठे होणार आहे. या वृत्तीतला आपला वावर बदलला पाहिजे. कोकणच्या हापूसची खासीयत आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी स्वतःच केलेली आहे. कोकणच्या किनारपट्टी भागात अगदी कडक कातळाला खड्डे मारून त्यात माती टाकून अनेक कोकणातील जुन्या-जाणत्या आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी एकेक किलोमीटरने पायी प्रवास करत हंड्याने पाणी नेऊन आंब्याच्या बागा उठवलेल्या आहेत. त्यामुळे कोकणचा हापूस आंबा नावारूपाला आणण्यात कोकणातील सामान्य शेतकऱ्यांने केलेले प्रामाणिक कष्ट आहेत. देशातील प्रत्येक भागातील त्या-त्या भागात पिकणाऱ्या फळांची, फुलांची किंवा वेगळेपणाची चर्चा ही नेहमीच होत असते. कोकण म्हटलं की, कोकणातील देवगड आणि रत्नागिरीत पिकणारा हापूस आंबा याच नाव जगभरात आहे. हे आज-काल नव्हे तर पूर्वीपासून इग्लंडच्या राजघराण्यातही कोकणच्या या हापूस आंब्याला विशेष स्थान आहे. जगभरात एक वेगळेपण जपत आजही कोकणचा हापूस स्वतःच स्थान टिकवून आहे. गेल्याकाही वर्षात सर्वच क्षेत्रात प्रचंड स्पर्धा सुरू झाली. या जागतिक स्पर्धेतही आपल्या कोकणच्या हापूस आंब्याला अनेक स्पर्धक समोर आले. आंब्यातील अनेक प्रजाती काही वर्षात पुढे आल्या आहेत. हापूस आंब्याशी साम्य दर्शविण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंब्यातील वेगवेगळ्या प्रकारात कर्नाटकमधील आंबा, गुजरातमधील बलसाड आंबा तसेच अन्य आंबेही स्पर्धेत उतरले; परंतु हापूस आंबा हा आपल्या कोकणचा मान, शान आणि तो आपल्या कोकणचा ब्रॅण्ड आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर या सर्वच जिल्ह्यातून होणारा आंबा हा कोकणातील आंबा असला तरीही रत्नागिरी आणि देवगड हापूस आंबा हा वैशिष्ट्यपूर्ण स्वादिष्ट हापूस आंबा म्हणून ओळखला जातो. या कोकणच्या हापूस आंब्याची काही वैशिष्ट्यता राहिलेली आहे. कोकणच्या या हापूसची बरोबरी अन्य कोणालाही करता येणार नाही; परंतु आपल्या देशातील काही राज्यातून कोकणच्या हापूस आंब्याशी स्पर्धा केली जात आहे. कर्नाटक राज्यातून येणारा आंबा कोकणचा आंबा म्हणून मार्केटमध्ये विकण्याचा प्रयत्न होतच आहे; परंतु दुर्दैवाने कोकणातील आंबा बागायतदार आजही निद्रिस्त आहे. आंबा बागायतदार जागा नाही कोकणातील आंबा, काजू, कोकम, सुपारीच पिक घेणारा बागायतदार शेतकरी महाराष्ट्रातील उर्वरित भागातील शेतकऱ्याप्रमाणे तो जागृत नाही. तो अल्प संतुष्ट आहे. समाधानीवृत्ती जी कोकणमध्ये आहे त्याचपद्धतीने कोकणातील शेतकरी आहे. तो फार जागा नाही. संघटीत तर नाहीच. राजकीय विचारधारा कोणतीही असली तरीही कोकणचा बागायतदार म्हणून एकत्रित येऊन आंबा, काजू बागायतदारांनी संघटीतपणे एकत्र येत एक दबाव तंत्र निर्माण करण्याची आवश्यकता होती आणि आजही आहे; परंतु कोकणात एखाद्या विकास विषयक विचारांनी एकत्र येण्याची नेहमीच अडचण आहे. या एकत्रित येण्याचा नेतृत्व कोणीही करावं. आंबा, काजू बागायतींशी संबंधित असणाऱ्या सर्वांनी संघटीत झाले पाहिजे. सातत्याने बागायतीतील विविध प्रश्नांवर समस्यांवर चर्चा झाली पाहिजे. तरच यातून काही चांगल घडविता येईल. कोणतीही चर्चा न करता संघटीत न होता विखुरलेपणाचे अनेक तोटे आहेत. याचा विचार करण्याची खऱ्या अर्थाने होण्याची आवश्यकता आहे. गुजरात हापूस म्हणून ब्रॅण्ड बाजारात आणण्याचा आणि मान्यता करण्याचा प्रयत्न होत आहे. प्रत्येक राज्य, विभाग स्वतःच ब्रॅण्डिंग करण्याचा प्रयत्न तर करणारच; परंतु तरीही कोकणातील आंबा, काजू बागायतदार शेतकऱ्यांनी आपल्यावर होणारे अतिक्रमण रोखले पाहिजे. यासाठी बागायतदार शेतकरी सर्वच राजकीय पक्षांनी सर्व मतभेद बाजूला सारत एकत्र येऊन कोकणच्या हापूस आंब्यांच्याबाबतीत संघर्ष करावा लागला तरीही तो केला पाहिजे. ह्यहापूस आंबाह्न हा कोकणचाच असला पाहिजे. राहिला पाहिजे. त्यासाठी जे काही कराव लागेल त्याची मानसिक तयारी असली पाहिजे. केंद्रिय स्तरावर माजी केंद्रिय मंत्री खा. नारायण राणे निश्चितपणे आवश्यक असणारे प्रयत्न करतील यात शंका नाही; परंतु कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी तसेच कोकणातील आंबा बागायतदार व आंबा व्यवसायातील तज्ञ असणाऱ्यांनी अभ्यासकांनी यावर बोलण्याची आवश्यकता आहे. हापूसच्या दबावगटाचे वातावरण निर्माण झाल्याशिवाय कोकणातील आंबा बागायतदारांमध्ये जागृकताही येणार नाही. कोकणामध्ये प्रत्येक बाबतीत कोणतीही गोष्ट घडली की तटस्तता असते. आम्हाला काय करायचय, आमच काय आहे त्यात नुकसान झाल तर आमचं कुठे होणार आहे. या वृत्तीतला आपला वावर बदलला पाहिजे. कोकणचा हापूस हा आपलाच ब्रॅण्ड आहे. आणि तो आपल्याकडून कोणी हिरावून घेण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्याविरोधात गप्प बसणे योग्य ठरणारे नाही. कोकणचा हापूस याची निर्मिती, त्याच संशोधन हे कोकणच्या मातीत राबणाऱ्या शेतकऱ्यांनी अपार कष्टाने निर्माण केला आहे. कोकणात आंबा तर सर्वत्रच होतो. परंतु कोकणातील किनारपट्टी भागातील आंब्याला एक वेगळा स्वाद आणि वास आहे. कोकणातील हापूस आंबा तयार (पिकला) झाला की त्याच दरवळणारा वास आंबा खाणाऱ्याला अस्वस्थ करीत असतो. कोकणच्या हापूस आंब्याच्या बागायती विशेषतः कोकणच्या किनारपट्टी भागात अधिक दिसतील. कोकणचा हा हापूस निर्माण आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी स्वतःच केली व कोकणच्या किनारपट्टी भागातही अगदी काळ्या कातळाला खड्डे मारून त्यात माती टाकून अनेक कोकणातील जुन्या-जाणत्या आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी एकेक किलोमीटरने पायी प्रवास करत हंड्याने पाणी नेऊन आंब्याच्या बागा उठवलेल्या आहेत. त्यामुळे हापूस कोकणचा हापूस आंबा नावारूपाला आणण्यात कोकणातील सामान्य शेतकऱ्यांने केलेले प्रामाणिक कष्ट आहेत. कोकणचा हापूस आंबा अनेक वर्षे नवी मुंबईच्या फळभाजी मार्केटमधील दलालांच्या हातात होता. आजही दलाल कोकणच्या हापूस आंब्याचा दर रूमाला खालून ठरवतात. आंबा बागायतदार शेतकऱ्याला आंबा दलाल ठरवेल तो दर आणि दलाल आंबा बागायतदार शेतकऱ्याला पाठवेल ती पट्टी अशीच काहीशी स्थिती कालही होती. तीच स्थिती आजही आहे. कोकण हापूसच्या ब्रॅण्डिंगसाठीही कोणी वेगळे प्रयत्न केले नाहीत. तर कोकण हापूसच्या रंग-रूप आणि स्वादिष्टतेनेच आपले स्थान निर्माण केले आहे. कोकणच्या हापूस आंब्याचे नेहमीच अढळस्थान राहिले आहे. त्याला स्पर्धा करण्याचा प्रयत्न नेहमीच होत राहणार आहे. कोकणच्या हापूस आंब्याशी स्पर्धा गेल्याकाही वर्षात केली जात आहे. त्या प्रयत्नांना यश त्यांना येत नसले तरीही अनेकांनी आपले प्रयत्न थांबवलेले नाहीत. कृषी क्षेत्रातही नवनवीन संशोधान करून जे प्रयत्न केले जात आहेत त्यातूनही अनेक राज्यांचे प्रयत्न हे स्वतःच्या भागातील आंबा अधिक मोठ्या प्रमाणात मार्केट कशारितीने काबीज करेल असाच राहणार आहे. आज ज्या पद्धतीने गुजरातच्या बलसाड आंब्याच्या माध्यमातून सुरू झाले आहेत. तोच प्रयत्न कधीतरी कर्नाटकच्या आंब्याच्याबाबतीत होणारा आहे. कर्नाटक राज्यात गेल्या दहा वर्षात आंबा बागायतीचे मोठ्याप्रमाणात क्षेत्र वाढले आहे. आता कोकणातील आंबा असेल किंवा काजू, कोकम आदी सर्वच बागायतदार शेतकऱ्यांनी फारच सावध असण्याची आवश्यकता आहे. जर आपण कोकणवासीय सावध नसलो तर मात्र बेसावध असल्याचा गैरफायदा उठवण्याचे प्रयत्न होतील. त्यासाठीच ही सावधानता बाळगणे अतिशय आवश्यक आहे. कोकणचा हा हापूस सर्वात श्रेष्ठच आहे. परंतु हे श्रेष्ठत्व टिकवून ठेवण्याची जबाबदारीही आपलीच आहे. सर्वच कोकणवासीयांनी आपल्या कोकणच्या हापूसचा ब्रॅण्ड कायम टिकवून ठेवलाच पाहिजे.



# लहानग्यांचा स्क्रीन टाइम कमी करणारा चिनी प्रयोग

**लहान मुलांचा मोबाईल, टीव्ही, टॅबवरील स्क्रीन टाइम कमी करणे अतिशय आव्हानात्मक झाले आहे. मात्र, जगातील सर्वाधिक तंत्रज्ञानाधिष्ठित असलेल्या चीनने यावर भारी तोडगा काढला आहे. काय आहे तो? इतर देशही तसे करू शकतील का?**

लहान मुलांच्या हातातील मोबाईल कसा सोडवायचा हा यक्षप्रश्न केवळ भारतातच नाही तर जगभर आहे. ही समस्या खरं तर दिवसागणिक उग्र होत आहे. जेवणापासून रात्री झोपेपर्यंत लहान मुले मोबाईलच्या आहारी गेलेली पहायला मिळतात. त्याचा परिणाम त्यांच्या आहार, शिक्षण, अभ्यास, शारीरिक क्षमता, झोप आदींवर झाला आहे. यातून मार्ग काढण्यासाठी नानाविध प्रयोग केले जात आहेत. मात्र, चीनने या क्षेत्रातही आघाडी घेतल्याचे पहायला मिळत आहे. 'अधिक झोप-कमी स्क्रीन वेळ' हे राष्ट्रीय धोरणच चीनने जाहीर केले आहे. त्याची जागतिक पातळीवर मोठी चर्चा होत आहे. जगातील सर्वाधिक विद्यार्थीसंख्या असलेल्या चीनने प्राथमिक ते माध्यमिक स्तरावर या धोरणांतर्गत अनेक आमूलाग्र बदल केले आहेत. त्याची दखल सर्वांनीच घेणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांवरील वाढता अभ्यासाचा बोजा, डिजिटल व्यसन, मानसिक ताण, झोपेचा अपुरा वेळ आणि परीक्षा केंद्रित संस्कृती यावर थेट प्रहार करणारे अनेक बदल चीनच्या या धोरणात आहेत. चीनचे शिक्षण मंत्रालय हे विद्यार्थी अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी शाळा आणि घरांमध्येही व्यापक सुधारणांची अंमलबजावणी करत आहे. हे धोरण केवळ चीनच्या शिक्षण क्षेत्रापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर आशिया-पॅसिफिक प्रदेशातील देश, विशेषतः भारत, दक्षिण कोरिया, जपान, सिंगापूर यांच्यासाठीही अभ्यासाचे नवे संदर्भ निर्माण करत आहेत. कारण ताणग्रस्त, झोपेअभावी त्रस्त आणि डिजिटल स्क्रीनच्या आहारी गेलेल्या मुलांची अवस्था अनेक ठिकाणी सारखीच आहे. त्यामुळे चीनने उचललेल्या पावलांचे विश्लेषण आवश्यक ठरते.

चीनने शाळांमध्ये मोबाईल फोन वापरण्यावर पूर्ण बंदी घातली आहे. अनेक देशांमध्ये हा मुद्दा वादग्रस्त असला, तरी चीनने विद्यार्थ्यांच्या डिजिटल ओव्हरलोडकडे अतिशय गांभीयार्ने पाहिले आहे. मोबाईल, टॅब, ऑनलाइन गेम्स, सोशल मीडिया यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता घटते, अभ्यासातील लक्ष विचलित होते आणि झोपेचा वेळ कमालीचा बिघडतो, असे अनेक सर्वेक्षणे सांगतात. मुलांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित रिपोर्ट्सनुसार, स्मार्टफोनकडे सतत ओढा निर्माण होत असताना चिंता, चिडचिड, नैराश्य आणि एकटेपणाचे प्रमाण वाढताना दिसते. या पार्श्वभूमीवर चीनने 'स्क्रीन-फ्री टाइम' सुरू केला आहे. दिवसभरातील काही काळ पूर्णपणे स्क्रीनपासून दूर राहण्याचे वेळापत्रक शाळांना बंधनकारक केले आहे. विशेष म्हणजे, चीन हा जगातील सर्वाधिक तंत्रज्ञानाधिष्ठित देशांपैकी एक आहे. असे असूनही चीनने स्क्रीन वापरावर नियंत्रणरेषा ओढल्याने जगाचे लक्ष त्याकडे वेधले गेले आहे.

चीनच्या शिक्षण व्यवस्थेत कठोर परीक्षा संस्कृती प्रसिद्ध आहे. उच्चस्तरीय परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा ताण प्रचंड वाढतो, ही बाब जगभर चर्चेत असते. परंतु आता सरकारने गृहपाठाचे प्रमाण मर्यादित करणे, आठवड्यातील एक दिवस नो होमवर्क डे ठेवणे तसेच शिक्षकांना अनावश्यक कामाच्या भारातून मुक्त करणे असे पाऊल उचलले आहे. शाळांना स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत की, गृहपाठाचे प्रमाण वयोगटानुसार काटेकोरपणे मर्यादित असावेत. परीक्षांची वारंवारता कमी करावी, विद्यार्थ्यांचे क्रमांक, रँकिंग आणि स्पर्धात्मक तुलना थांबवावी, आठवडाअखेर किंवा सुट्टूयांच्या काळात प्रचंड गृहपाठ देणे टाळावे. हा निर्णय अभ्यासावरील दडपण कमी करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. लहान वयातील विद्यार्थ्यांना रात्री उशिरापर्यंत गृहपाठ करणे भाग पडते, सुट्टीचा वेळ मिळत नाही आणि त्याचा मानसिक व भावनिक आरोग्यावर होणारा परिणाम हे चीनच्या शैक्षणिक चचेर्तील संवेदनशील मुद्दे आहेत. या नवीन धोरणांनी ते गांभीयार्ने हाताळले आहेत.

दैनंदिन अभ्यासासोबत शारीरिक हालचालींचा मोठा अभाव हा आधुनिक शिक्षणाचा एक गंभीर मुद्दा आहे. चीनने याविरोधात एक ठाम भूमिका घेत शाळांमध्ये दररोज किमान दोन तास शारीरिक क्रिया अनिवार्य केली आहे. खेळ, व्यायाम, योगा, क्रीडा स्पर्धा आदींद्वारे विद्यार्थ्यांचे मनःस्वास्थ्य, शारीरिक तंदुरुस्ती आणि सामाजिक कौशल्ये विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. अनेक अभ्यासात सिद्ध झाले आहे की, शारीरिक क्रिया विद्यार्थ्यांच्या मेंदूतील जागरूकता, स्मरणशक्ती, एकाग्रता, सामाजिकता आणि तणाव नियंत्रण सुधारतात. त्यामुळे चीनचे हे धोरण फक्त आरोग्यावर लक्ष केंद्रित नसून शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्याचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

चीनने शाळांच्या वेळांमध्येही बदल केले आहेत. विद्यार्थ्यांची झोप पूर्ण घेतलेली असेल याची काळजी घेण्यात येत आहे. झोपेची कमतरता विद्यार्थ्यांच्या वागणुकीवर, अभ्याससक्षमतेवर आणि मानसिक आरोग्यावर जबरदस्त परिणाम करते. वैद्यकीय क्षेत्रातूनही त्याबाबत वारंवार बोलले जात आहे. चीनमध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार, प्राथमिक स्तरातील बरीच मुले ८ तासांपेक्षा कमी झोप घेतात, तर माध्यमिक विद्यार्थ्यांची झोप ६ ते ६.५ तास असते. त्यामुळे शाळांची वेळ बदलणे, विश्रांतीसाठी अधिक वेळ देणे आणि घरातील वातावरण शांत व सकारात्मक ठेवण्याबाबत पालकांना सूचनाही दिल्या आहेत.

चीनमध्ये अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांमधील आत्महत्यांचे प्रमाण आणि तणावाशी संबंधित विकार वाढल्याची नोंद आहे. हे लक्षात घेऊन सरकारने मेंटल हेल्थ टीचर्स, काऊन्सलिंग सेवा, सायकॉलॉजिकल स्क्रीनिंग शाळांमध्ये बंधनकारक केले आहे. विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजा, सामाजिक संबंध, सहपाठी गटातील नातेसंबंध, कुटुंबातील वातावरण या सर्व गोष्टींवर सामूहिकरीत्या लक्ष देण्याचा प्रयत्न या धोरणांमधून स्पष्ट दिसतो. या धोरणाचे उद्दिष्ट म्हणजे, 'अभ्यासात यश मिळवणे हीच प्रगती नाही; तर निरोगी, आत्मविश्वासू, संतुलित आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम पिढी घडवणे.'

सद्यस्थितीत भारतासह अनेक देशांमध्येही मोबाईलचा अतिवापर, कोचिंग संस्कृतीत वाढ, गृहपाठाचा बोजा, झोपेचा अभाव, पालकांचे अपेक्षा, दडपण या समस्या गंभीर आहेत. भारतातही नवीन शैक्षणिक धोरण लागू करून काही सकारात्मक प्रयत्न सुरू झाले आहेत, परंतु चीनसारखी कठोर आणि व्यापक अंमलबजावणी करण्यासाठी अजूनही बराच पल्ला भारताला गाठायचा आहे. चीनमधील तज्ज्ञांचे मत आहे की, तंत्रज्ञानाचा उपयोग आवश्यक असला तरी नियंत्रण अधिक गरजेचे आहे, विद्यार्थ्यांना निरोगी मन व शरीर मिळाले, तर त्यांचे शैक्षणिक प्रदर्शन आपोआप सुधारते, गुण आणि रँकिंगपेक्षा मुलांची आनंदी वृत्ती अधिक महत्त्वाची आहे.

चीनचे 'अधिक झोप, कमी स्क्रीन वेळ' हे धोरण केवळ शैक्षणिक सुधारणा नसून, भविष्यातील पिढीच्या मानसिक, भावनिक आणि शारीरिक विकासाचे संरक्षण करण्याचा व्यापक प्रयत्न आहे. जागतिक स्तरावर वाढत चाललेल्या डिजिटल अवलंबित्व, तणाव, नैराश्य आणि अस्वस्थता या समस्यांच्या पार्श्वभूमीवर चीनचा हा निर्णय अधिक महत्त्वाचा ठरतो.

जगातील इतर शिक्षण व्यवस्थांसाठी विशेषतः भारतासाठी हे एक महत्त्वाचा अभ्यासपाठ ठरू शकते. शिक्षण म्हणजे फक्त गुण, परीक्षा किंवा करिअर नाही तर ती आहे एक संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया. चीनचे हे पाऊल या संकल्पनेला नवीन बळ देणारे आहे. चीनकडून याबाबत होत असलेली अंमलबजावणी लक्षात घेऊन भारताने यासंदर्भात विशेष धोरण तयार करणे गरजेचे आहे.

# ५० खोके ते कॅश बॉम्ब!



साडेतीन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात '५० खोके एकदम ओके, शिवसेना शिंदे एमएलए, शिंदे गृप, कॅश बॉम्ब, अंबादास दानवे, महेंद्र दळवी' हे जणू घोषवाक्य बनले होते. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बंडखोरीमुळे शिवसेनेत फूट पडली आणि बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केलेल्या शिवसेनेची शिंदेंची शिवसेना आणि ठाकरेंची शिवसेना अशी ओळख बनली. याच ५० खोक्यांवरून आजही फुटलेल्या आमदारांना डिवचले जाते. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे दोन दिवसांत फुटलेले आरोपांचे कॅश बॉम्ब! यातील पहिला कॅश बॉम्ब ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी अधिवेशनाच्या दुर्सया दिवशी फोडला.

या व्हिडीओत अलिबागचे आमदार महेंद्र दळवी दिसत असून पैशांची थप्पीही दिसत आहे. यावरून दानवेंनी त्यांना लक्ष्य केले. तर दुर्सया दिवशी शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांनीही महेंद्र दळवींना घेरले आणि दुसरा कॅश बॉम्ब त्यांनी मंत्री भरत गोगावले यांच्यावर टाकला. आता हे व्हिडीओ खरे आहेत की मॉर्फ केलेले यावरून आरोप-प्रत्यारोप होत राहतील. पण कॅश बॉम्बच्या निमित्ताने शिंदेंची शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) यांच्यात शाब्दिक द्वंद्व सुरू आहे. एक बाब लक्षात घेतली पाहिजे, कॅश बॉम्बचा हा काही पहिलाच व्हिडीओ नाही. अशाच पद्धतीचा व्हिडीओ याआधी धुळ्यातील शासकीय विश्रामगृहातून व्हायरल झाला होता.

२२ मे २०२५ रोजी आमदार आणि विधिमंडळ समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांचे स्वीय सहाय्यक किशोर पाटील यांच्या नावावर जी रूम बूक होती या रूममधून तब्बल १ कोटी ८४ लाख ८४ हजार रुपयांचे घबाड सापडले होते. धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील विकासकामांची पाहणी करण्यासाठी ११ आमदारांचे शिष्टमंडळ आले होते. त्यावेळी आमदार अनिल गोटे यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी छापा टाकल्यानंतर हे घबाड हाताशी लागले होते. दुसरी घटना मंत्री संजय शिरसाट यांच्याबाबत घडली होती. जुलै २०२५ मध्ये ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक व्हिडीओ ट्वीट केला होता. त्यात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट त्यांच्या बेडरूममध्ये बसलेले दिसत होते आणि त्यांच्या शेजारी पैशांनी भरलेली बॅग दिसत होती.

या दोन्ही व्हिडीओंवरून प्रचंड गदारोळ झाला होता. ते पैसे कुठले, कुठून आले, याचा काहीही पत्ता लागला नाही. राजकीय आरोप-प्रत्यारोपांत मूळ मुद्दा वाहून गेला. तर शासकीय विश्रामगृहात जप्त केलेल्या १ कोटी ८४ लाख ८४ हजार कुठून आले, हेही स्पष्ट झाले नव्हते. त्यानंतर आता हिवाळी अधिवेशन सुरू असताना ८ आणि ९ डिसेंबर रोजी दोन व्हिडीओ व्हायरल करून आमदार महेंद्र दळवी आणि मंत्री भरत गोगावले यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न झाला. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या काळात आणि नगरपरिषदांच्या निवडणुकीतही बॅगेतून पैसे नेल्याचा आरोप खुद्द एकनाथ शिंदे यांच्यावर झाला होता. या सर्वांना जोडणारा समान धागा म्हणजे हे सर्व आमदार शिवसेनेचे आहेत. यात आणखी एक समान धागा म्हणजे पहिल्या दोन्ही प्रकरणांचे पुढे काहीही झालेले नव्हते.

आताच्या व्हिडीओंची चौकशी करण्याची मागणी होत असली तरी हे आरोप सभागृहाबाहेर होत आहेत. दोन्ही बाजूंनी आरोप, दावे, प्रतिदावे केले जात आहेत. त्यामुळे यातून काही साध्य होईल, असे सध्यातरी सांगता येत नाही. तसेच क्लीन चिट देण्याची परंपरा, शिवाय सत्ताधारी पक्षाचे आमदार असल्यामुळे काही होण्याची शक्यताही दिसत नाही. तंत्रज्ञानाचा वापर करत व्हिडीओ व्हायरल करणे, आता सहज शक्य झाले आहे. तसे प्रकार होत आहेत. मात्र, यातून एक बाब प्रकर्षाने लक्षात आली आहे ती म्हणजे राज्यातील राजकारणात पैशांचा महापूर वाहात आहे. पैशांचा अवास्तव वापर, हे महाराष्ट्रातील राजकीय अंग झाल्याची काही वर्षांपासून चर्चा होत आहे. आताही नगर परिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीत मालवणमध्येही असाच प्रकार उघडकीस आला होता.

शिवसेनेचे आमदार निलेश राणे यांनी एका कार्यकर्त्याच्या घरी धाड टाकून २५ लाख रुपये पोलिसांना जप्त करायला लावले होते. त्यानंतर हे पैसे निवडणुकीपूर्वी वाटण्यासाठी आणल्याचा आरोप झाला होता. त्यापुढे जात हे पैसे व्यावसायिकाचे होते, अशी बाजू मांडण्याचा प्रयत्न झाला. तरीही एक व्यक्ती किती रोख रक्कम बाळगू शकते, याला नियम आहेत. तो नियम पाळला गेला का, याचे उत्तर मिळत नाही. आता मालवणमधील विषयही बाजूला पडला आहे. निवडणुका पैशांचा खेळ बनला आहे आणि अगदी ग्रामपंचायत, नगर परिषदांच्या निवडणुकांसाठी उमेदवाराला कोटीच्या घरात खर्च करावा लागत असल्याची उघड चर्चा होत आहे. आता प्रश्न उपस्थित होतो की, निवडणुकीसाठी लाखो किंवा कोटीच्या घरात रुपये खर्च करून कुणी समाजसेवा करत नाही. तसेच आमदार किंवा खासदार म्हणून मिळणारे वेतन खर्च केलेल्या रकमेपेक्षा खूपच कमी असते.

ग्रामपंचायत आणि नगर परिषदांचा आवाका खूपच कमी असल्यामुळे लाखो रुपये खर्च करून निवडणूक लढवणारे उमेदवार आम्ही समाजकार्य करण्यासाठी आलो, असे म्हणत असतील तर कसा विश्वास ठेवायचा? तसेच नगरसेवक किंवा आमदार झाल्यानंतर त्यांची झपाट्याने बदलणारी आर्थिक परिस्थिती पाहिल्यानंतर लोकांची कामे किती होतात आणि स्वहित किती साधले जाते, हे सांगायला कुणाचीही गरज उरलेली नाही. काही गोष्टी खुलेआम चालतात मात्र, त्यावर खुलेआम चर्चा केली जात नाही, एवढंच! आपल्याकडेही यापेक्षा फार काही वेगळे घडत नाही. सर्वत्र पैशांचा बाजार मांडला जात आहे. खरे तर कॅश बॉम्ब वगैरे किती खरे किती खोटे, हा मुद्दा खरोखरच बाजूला ठेवा. यामागची मानसिकता लक्षात घ्यायला हवी, जी लोकशाहीसाठी घातक आहे.

# चटपटीत मसाला पाव

**साहित्य–** अमूल बटर अर्धी वाटी, दोन मध्यम कांदे बारीक चिरून, दोन मध्यम टोमॅटो बारीक चिरून, दोन टेबलस्पून बारीक चिरलेली हिरवी मिरची, एक टेबलस्पून आलं-लसूण पेस्ट, पाव वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, दोन चमचे पाव भाजीचा मसाला, पावभाजीचे पाव, एक चमचा लाल मिरचीचे तिखट, एक चमचा लिंबाचा रस, चवीनुसार मीठ.

**कृती–** तव्यावर अमूल बटर घालून गरम करून घ्या व त्यात बारीक चिरलेला कांदा घालून तो मऊ होईपर्यंत परता. मग त्यात आलं-लसणाची पेस्ट घालून दोन मिनिटे परतून घ्या. नंतर पाव भाजीचा मसाला घालून पुन्हा दोन मिनिटे परता. आता त्यात बारीक चिरलेले टोमॅटो व लाल मिरचीचे तिखट घालून टोमॅटो मऊ होईपर्यंत परता. मग हिरव्या मिरच्यांचे बारीक चिरलेले तुकडे घालून ते कुरकुरीत होईपर्यंत परता आता पावाच्या दोन्ही बाजूला (बाहेरून आणि आतून) बटर लावून दोन्ही बाजू भाजून घ्या.

नंतर आतील बाजूला आपण तयार केलेला मसाला सगळीकडे पसरून लावा. मसाला लावलेला पाव तव्यावर ठेवून डावाने सारखा दाबत राहून हलका भाजून घ्या. याच पद्धतीने सगळे पाव मसाल्याचे तयार करून घ्या. गरम मसाला पाव पुदिन्याच्या चटणी सोबत सर्व्ह करा.



# चेहरा आरोग्याचा आरसा

**आपली त्वचा हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. त्यातल्या त्यात चेर्हयाची त्वचा आपले आरोग्य कसे आहे हे दर्शवीत असते. जुन्या काळातील आयुर्वेदासारख्या सगळ्या जुन्या उपचार पध्दतींनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. चीनमध्ये लोकप्रिय असलेल्या ऍक्युपंक्चर किंवा ऍक्युप्रेशर अशा जुन्या उपचार पध्दतीत सुध्दा चेहरा बघून आरोग्याचे निदान केले जाते.**

**आयुर्वेदामध्ये** जशी नाडी परीक्षा आहे. तेवढी ही चेर्हयाची परीक्षा शास्त्रशुध्द आणि नेमकी नाही. परंतु आरोग्याच्या काही तक्रारींचा अंदाज चेर्हयाच्या त्वचेवरून येतो असे अनेक अनुभवी डॉक्टर आणि वैद्यांचे म्हणणे आहे. आपल्या शरीरातल्या अवयवांमध्ये जे काही घडते त्याची प्रतिक्रिया चेर्हयावर उमटते आणि चेर्हयावरून जे दिसते त्याचाच विस्तार शरीरातल्या अवयवांमध्ये झालेला असतो असे चिनी लोक मानतात.

आधुनिक काळातले त्वचारोग तज्ञ देखील त्वचेवरच्या विविध डागांवरून रुग्णाच्या कोणत्या अवयवात काय बदल झालेले आहेत हे हेरता येते असे मान्य करत आहेत. काही डॉक्टरांनी तर चेर्हयावरचा कोणता बदल शरीरातल्या कोणत्या दोषाचा द्योतक आहे याचे काही ठोकताळे बसवलेले आहेत. तोंडामध्ये होणारे बदल किंवा दिसणारे दोष हे पोटातल्या विकाराचे द्योतक असतात. अपचन झालेल्या रुग्णाच्या तोंडाला दुर्गंध येतो. पोटातल्या काही विकारांचे प्रतिबिंब तोंड येण्यात उमटत असते. मूत्रपिंड आणि मूत्राशय यात काही दोष असतील तर ते दोष हनुवटीवर उमटतात. त्याच बरोबर लिव्हरमध्ये काही दोष असेल तर पापण्यामध्ये बदल होतात. काही लोकांना या गोष्टी मान्य नाहीत परंतु शेवटी हे ठोकताळे आहेत.





काही लोकांच्या चेर्हयावर मानेच्या मागे त्वचा फ्किकट पडायला लागते तेव्हा काही विशिष्ट आजार बळावत असतात. काही लोकांच्या चेहऱ्यावरच्या काही बदलांतून अनेक डॉक्टरांना तो मधुमेहाला बळी पडण्याची शक्यता लक्षात येते. चेहऱ्यातले काही बदल विशेषतः कानाच्या मागचे बदल हे रुग्ण ज्यादा अन्न प्राशन करत असल्यचे द्योतक असते असे काही डॉक्टरांच्या लक्षात आले आहे.

सतत पैशाच्या मागे लागणारे लोक, दारू पिणारे लोक, रक्तदाब वाढलेले लोक चेर्हयावरून सरळ सरळ ओळखू येतात मात्र त्यासाठी अनुभवी नजर लागते.

# पपई खाण्याचे १० आरोग्यदायी फायदे!

**चवीला गोड, शरीराला पोषक आणि त्वचेचे आरोग्य सुधारणारे फळ म्हणजे पपई ! पपई शरीराला गरम असल्याने वातावरणात गारवा असताना खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाण्याचे आणखी दहा फायदेदेखील आहेत....**

▮ **शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करते–** पपईमध्ये व्हिटामिन सी व फायबरचे प्रमाण अधिक असल्याने रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहण्यापासून बचाव होतो. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहिल्याने हृद्यविकाराचा धोका संभवतो.

▮ **वजन घटवण्यास मदत होते–** एका मध्यम आकाराच्या पपईमध्ये 120 कॅलेरीज असतात. त्यामुळे जर तुम्ही वजन घटवण्याच्या विचारात असाल तर पपईचा आहारात नियमित समावेश करा. पपईतील डायटरी फायबर्समुळे वेळी-अवेळी लागणाऱ्या भूकेवर नियंत्रण मिळवणे शक्य होते.

▮ **रोगप्रतिकारशक्ती वाढते–** आजारांशी सक्षमतेने सामना करण्यासाठी तुमची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणे फार गरजेचे आहे. तसेच शरीरातील व्हिटामिन सीच्या गरजेपेक्षा 200% अधिक व्हिटामिन सी केवळ पपईमुळे मिळू शकते.

▮ **मधुमेहींसाठी गुणकारी–** पपई चवीला गोड असली तरीही त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. कपभर पपईच्या तुकड्यांमधून केवळ ८.3 ग्रॅम साखर असते. यामुळे मधुमेहींनी पपई खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाल्ल्याने मधुमेह जडण्यापासून बचाव होतो.

▮ **डोळ्यांचे आरोग्य सुधारते–** पपईमध्ये व्हिटमिन ए मुबलक प्रमाणात आढळते. डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी व्हिटामिन ए अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या वयानुसार दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून बचावण्यासाठी पपईचा आहारात समावेश करावा.

▮ **सांधेदुखीपासून आराम मिळतो–** पपईमध्ये व्हिटामिन सी प्रमाणेच वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांना पपईचे सेवन फारच हितकारी आहे. पपईतील व्हिटामीन सी घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसेच सूज कमी करण्यास मदत करतात.

▮ **पचन सुधारते–** आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे जंक फूड किंवा बाहेरचे जेवण टाळणे हे काहीसे कठीण आहे. त्यामुळे अशा खाण्याने पचनशक्ती बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी पपई खाल्ल्याने अरबट-चरबट खाल्ल्याने होणारे दुष्परिणाम टाळण्यास मदत होते. पपईतील पपैन नामक एंजाईम पचन कार्य सुधारते.

▮ **मासिक पाळीचा त्रास कमी होतो–** अनियमित मासिक पाळी तसेच मासिक पाळीच्या काळातील त्रास अशा समस्या दूर करण्यासाठी पपई फारच उपयुक्त आहे.

▮ **कर्करोगापासून बचाव होतो–** पपईमधील ऍन्टीऑक्सिडंट घटक शरीरातील फ्री रॅडीकल्सपासून तुमचा बचाव करते. तसेच पपईतील बीटा कॅरोटीन आतड्यांच्या कर्करोगापासून बचाव करते.

▮ **ताण-तणाव कमी होतो –** दिवसभराच्या धावपळीनंतर वाटीभर पपईचे काप खाल्ल्यास थकवा कमी होण्यास मदत होते. तसेच व्हिटामिन सी शरीरातील हार्मोन्सचे प्रमाण संतुलित राखते.



# आता डेस्कटॉपवरून करा व्हॉट्सऍप व्हिडिओ आणि ऑडियो कॉल

**व्हॉट्सऍप कंपनी आपल्या यूजर्ससाठी नेहमीच नवीन फीचर्स आणते. आता कंपनी नवीन फीचर्स वर काम करीत आहे. व्हॉट्सऍप यूजर्सला आता डेस्कटॉपवरून सुद्धा कॉल करता येणार आहेत. या कॉलमध्ये ऑडियो आणि व्हिडिओचा समावेश असेल.**



**व्हॉट्सऍप** ने डेस्कटॉपसाठी अनेक फीचर्स आणले आहेत. परंतु, दोन फीचर्सची कमतरता अजूनही जाणवत आहे. पहिले आहे डेस्कटॉप वर व्हॉट्सऍप कॉल करणे आणि दुसरे डेस्कटॉपवर व्हिडिओ किंवा किंवा ऑडियो करणे. यातील एका फीचरची कमतरता आता जाणवणार नाही. खरं म्हणजे व्हॉट्सऍप ने विंडोजसाठी एक नवीन ऍप आणला आहे. हा ऍप वेगाने लोड होते. तसेच सहज इंटरफेस सोबत येते. याच्या मदतीने व्हॉट्सऍप आपल्या यूजर्सला जास्तीत जास्त ८ लोकांसोबत ग्रुप व्हिडिओ कॉल आणि ३२ लोकांसोबत ऑडियो कॉल करण्याची सुविधा देते.

**मैक ओएस ला ही सुविधा मिळणार**

समोर आलेल्या माहितीनुसार, फक्त विंडोजचा यात समावेश करण्यात आला आहे. परंतु, हे फीचर मॅकबॅकच्या यूजर्ससाठी उपलब्ध केले जाणार आहे. कारण, सध्या मॅक डेस्कटॉप व्हर्जन बीटा टेस्टिंग मध्ये आहे. नुकत्याच एका ब्लॉग पोस्टमध्ये मेटाने म्हटले की, विंडोजच्या इंस्टेंट मेसेजिंग ऍप व्हॉट्सऍपला नवीन फीचर्स सोबत एक नवीन लूक मिळाले आहे. मेटाने म्हटले की, आम्ही विंडोजसाठी एक नवीन व्हॉट्सऍप ऍप आणले जात आहे. जे वेगाने लोड होईल. या ऍप सोबत मोबाइल व्हर्जनच्या सारखे इंटरफेस सोबत येईल.

**डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप कॉल कसा कराल?**

डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप च्या माध्यमातून व्हिडिओ किंवा ऑडियो कॉल करण्याची सुविधा अपडेट सोबत उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला डेस्कटॉप व्हॉट्सऍप ऍपला अपडेट करावे लागणार आहे. अपडेट करण्यात आल्यानंतर तुम्हाला मोबाइल इंटरफेस प्रमाणे व्हिडिओ कॉल आणि ऑडियो कॉलचे आयकॉन दिसेल.



# पोळीला तूप लावून खाणे आरोग्यास लाभदायक

**हेल्दी** राहण्यासाठी शरीरास सकस आहाराची फार गरज असते. आताच्या काळात सर्वांना फास्ट फूड जास्त आवडतात, त्यामुळे रोजच्या आहाराकडे दुर्लक्ष होते. फास्ट फूड आणि तेलकट पदार्थ आरोग्यास घातक असतात. कित्येक लोक पोळ्या बनवण्यासाठी तेल किंवा डालड्याचा उपयोग करतात. तर पोळ्या बनवण्यासाठी तूपाचा वापर शरीरास अधिक लाभदायक आहे. तूपामध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्वे असतात. तुम्हाला वाटत असेल, तूप खाल्याने वजन वाढतं तर हा एक गैरसमज आहे.

▮ वजन कमी करण्यासाठी तूपाची मदत होते.

▮ तूप आपल्या शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

**त्वचेसाठी लाभदायक तूप**

तूपामध्ये एन्टीऑक्सीडेंट घटक असतात ते त्वचेसाठी फार फायदेशीर असतात. त्याचप्रमाणे त्वचेमध्ये असलेले डेड सेल्स तूपाच्या नियमित सेवनाने नष्ट होतात.

**फेफरे (फिट्स) हा आजार आपल्या मेंदूशी संबंधित आहे. आपल्या मेंदूमध्ये अतिसुक्ष्म वाहिन्या असतात, त्यांना न्यूरॉन असे म्हटले जाते. न्यूरॉन आपापसात नेहमी संपर्कात असतात. एकमेकांना संदेशाचे आदानप्रदान करत असतात. संदेश वहन करण्याचे कार्य इतक्या प्रचंड वेगाने होत असते की, त्याने आपल्या मेंदूत रासायनिक व विद्युत तरंग निर्माण होतात. परंतु, एखाद्या संदेशाचे व्यवस्थित वहन न होता तो वाहिनीत अडकून पडतो. मेंदूचे संतुलन बिघडते व त्यामुळे आपल्याला फिट्स येतात. पण घाबरून जाऊ नका. फिट्सवर घरगुती उपचार आहेत.**

# फिट्स आल्यास घाबरू नये

**फिट्स** दोन मिनिटांपेक्षा जास्त वेळाची नसते. ती केव्हाही व कोणत्याही वयाच्या व्यक्तीला येऊ शकते. अचानक आपल्याला चक्कर येऊन आपण जमिनीवर पडतो व शुद्ध हरपते. फिट्स आल्यानंतर आपल्या हातापायात कंप निर्माण होतात. तोंडातून फेस येतो. वारंवार फिट्स येत असेल तर आपल्याला खालील टिप्स उपयोगी पडू शकतात.

▮ अक्कलकाढा १०० ग्रॅम व लिंबू सत्त १०० ग्रॅम यांचे मिश्रण मधामध्ये एकजीव करून ५ ग्रॅम प्रतिदिन सकाळी काहीही न खाण्यापूर्वी चाखल्याने फिट्स येणे कायमचे दूर होते.

▮ सालवटीचे चूर्ण एक ग्रॅम प्रतिदिन मधासोबत चाखावे. त्यानंतर दूध प्यावे. असे नियमित केल्याने जुनाट फिट्स दूर होतात.

▮ शुद्ध हरपलेल्या व्यक्तीला लसूण कुटून वास दिल्यास तो शुद्धीवर येतो.

▮ रोज ३-५ लसणाच्या पाकळ्या दुधात टाकून ते प्यायल्याने फिट्स येत नाहीत.

# आरामदायक 'ट्रेंडी' पँट



**फॅशनच्या** जगात महिलांसाठी पँटचे पुनरागमन झाले आहे. पॅरिस फॅशन शो असो की लक्मे फॅशन वीक सगळीकडे पँट्स परिधान केलेल्या मॉडेल दिसू लागल्या आहेत. एवढंच नव्हे तर फॉर्मलशिवाय याचा उपयोग कॅजुअल्समध्ये देखील होताना दिसत आहे.

सध्या कॉर्पोरेट कल्चरमुळे कपडे घालण्याच्या पद्धतीत कमालीचा बदल जाणावत आहे. मुली फॅशनसोबतच आरामालाही महत्त्व देत आहेत. म्हणूनच जीन्स-ट्राऊजरसारखे कपडे मुलींची पहिली पसंत झाली आहे. पिकनिक, आऊटिंग किंवा वीकेंडला जीन्स परिधान करताना दिसत आहेत. पण मीटिंग, कॉन्फरन्स, ऑफिशियल पार्टी किंवा सेमिनारच्या वातावरणात हे फिट बसत नाही. म्हणूनच मुलींनी आता पँट-ट्राऊजरला प्रमुख पोशाखांमध्ये सहभागी केले आहे. त्यातही विविध प्रकार आहेत. - ट्राऊजर, सिक्स पॉकेट, कार्गो, बूट कट आदी.

तुम्ही ऑफिस व्यतिरिक्त टी पार्टी किंवा डिनर पार्टीत सिल्क शर्टासोबत पँट परिधान करू शकता.

पँट आरामदायक असल्यामुळे हल्ली मोठ्या इन्स्टिट्यूटनी शर्ट-पँट हा युनिफॉर्म म्हणून स्वीकारला आहे. एअरलाइन्स, हॉस्पिटलच्या व्यतिक्ति काही बँका आणि कॉलेजमध्ये आता मुली युनिफॉर्म म्हणून पँट-शर्ट परिधान करायला लागल्या आहेत. त्याने स्मार्टनेस वाढतोच आणि धावपळीची कामे सोपी होतात. पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसते. तसेच त्यावर बीडसची माळ, डायमंड नेकलेस किंवा नेकपीस, ब्रेसलेट, लेदर बेल्ट, कॉर्पोरेट बॅग्जपासून क्लच आणि पर्स हेही मॅच होते. पँट परिधान केल्यास लेदर शूज, सँडल, ट्रेंडी चप्पलसुद्धा परिधान शकता. त्याचबरोबर आपण पिकनिक आणि खेळण्यासाठी कार्गो किंवा सिंपल बूट कट देखील वापरू शकता.

**पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसतो.**



# वेळ सत्कारणी लावा

**बयापैकी** श्रीमंत असलेल्या कुटुंबाच्या काही सवयी असतात. विशेषतः वृद्ध स्त्रियांना पेपर वाचायचा असतो. सकाळ-संध्याकाळ बाहेर फिरून यायचे असते. ठरावीक पदार्थाचा आस्वाद घ्यायचा असतो. वैयक्तिक अशी त्यांची कामे त्यांना करायची असतात. इतकेच नव्हे; तर आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठी व्यायामही करायचा असतो. तेवढे पथ्यही त्यांना पाळायचे असते. वेळच्या वेळी औषध घेणे आणि आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सोबतीला कोणी मदतनीस स्त्री मिळाली तर ती त्यांना हवी असते. ज्यांना अशा सेवेत रूची आहे, त्यांना ही कामे करता येतील.

आई-वडिलांकडे लक्ष देता यावे म्हणून काही मुले-मुली खासगीरीत्या नर्स ठेवत असतात. पण ही नर्स फक्त आरोग्याची देखभाल करते. आपण पुढाकार घेतला तर सोप्या गोष्टी करता येणे शक्य आहे.



# वाढतं वजन थांबवायचंय ?
## मग आहारात करा या घटकांचा समावेश

**बदलत्या जीवनशैलीमुळे वाढतं वजन ही प्रत्येकाची समस्या झाली आहे. त्यामुळे वाढलेले वजन कमी करण्याचा अनेक जण वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करत असतात. अनेक वेळा डाएट करूनही वाढलेल्या वजनाला आळा बसत नाही. अशा वेळी आहारामध्ये वजन कमी करण्यास मदत करणाऱ्या पदार्थांचा समावेश करायला हवा. या पदार्थांच्या सेवनामुळे वारंवार लागणाऱ्या भुकेला आळा बसतो.परिणामी वजन लवकर वाढत नाही. असेच काही पदार्थ रुपम सिन्हा यांनी सांगितले आहेत.**

**लाल मिरची**

रोजच्या जेवणाला झणझणीतपणा येण्यासाठी अनेक वेळा गृहिणी भाजी, आमटीमध्ये लाल मिरची किंवा लाल तिखटाचा वापर करतात. मात्र जेवणाची रंगत वाढवणारी लाल मिरची वजन कमी करण्यासाठीदेखील तितकीच उपयोगी आहे. लाल मिरचीमध्ये कॅप्सॅकीन संयुग असतात. कॅप्सॅकीनमुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. परिणामी वाढत्या वजनाला आळा बसतो.

**लसूण**

एखाद्या पदार्थाला खमंग फोडणी द्यायची असेल लसूण गरजेचाच आहे. मात्र लसणाचा उपयोग केवळ जेवणासाठीच होत नसून आजारपणातही होतो. अनेक वेळा आजारपणामध्ये लसणाचा वापर औषध म्हणून केला जातो. त्याप्रमाणेच वजन कमी करण्यासाठीदेखील लसणाचा उपयोग होतो. जेवणामध्ये लसणाचा समावेश असेल तर जेवताना पोट भरलंय ही भावना मस्तिष्कापर्यंत पोहोचवण्याचं काम लसूण करतो. त्यामुळे पोट भरल्यानंतर आपण आपोआप जेवायचं थांबवतो. त्यामुळे आहारात लसणाचा समावेश करायला हवा. त्यासोबतच रक्ताच्या गुठळ्या होण्यापासून लसूण मदत करतो. तर हृदयाचे आरोग्यही नीट राहते.



**लाल आणि हिरवी मिरची**

मसाल्याच्या पदार्थांमधील महत्त्वाचा घटक म्हणजे मिरची. लाल मिरचीप्रमाणेच सुकी लाल मिरची किंवा हिरवी मिरची यांचाही तितकाच शरीराला फायदा होतो. मिरचीमध्ये व्हिटॅमिन ए, सीसोबतच बीटा कॅरोटिन असतं. त्यामुळे योग्य प्रमाणात मिरचीचं सेवन केलं तर पचनक्रिया सुधारते आणि भूक नियंत्रणात राहते.

**दालचिनी**

भूक नियंत्रणात ठेवण्याचं महत्त्वाचं काम दालचिनी करत असते. दालचिनीमुळे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते. त्यासोबतच दालचिनीच्या सेवनामुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. दालचिनीमुळे धमन्यांचं कार्यही सुधारते आणि शरीरातील वाढलेल्या कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात आणली जाते.

**कोकम (आमसूल)**

आंबट, चटपटीत अशी चव असणाऱ्या कोकमाचे अनेक फायदे आहेत. भूक नियंत्रणात आणण्यासाठी कोकमचा उपयोग करण्यात येतो. त्यामुळे जेवणापूर्वी रोज एक कोकम खावं.

# चव वाढवणाऱ्या चक्रीफुलाचे असेही गुणकारी फायदे

**गरम मसाल्यांसाठी प्रसिद्ध असलेलं राष्ट्र म्हणजे भारत. त्यामुळे प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या स्वयंपाक घरामध्ये गरम मसाल्याचे पदार्थ हमखास आढळतात. जेवणाची चव वाढवणाऱ्या या पदार्थांपैकी काहींचा वापर आजीबाईच्या बटव्यासाठीही केला जातो. त्यामुळे चवीसोबतच हे पदार्थ गुणकारी असल्याचं दिसून येतं. मसाल्याच्या पदार्थांमध्ये महत्त्वाचा मानला जाणारा घटक म्हणजे चक्रीफूल. चक्रीफूल केवळ मसाल्याची चव वाढवत नसून त्याचे अन्यही काही गुणधर्म आहेत. इशा त्यागी यांनी चक्रीफुलाचे काही गुणधर्म सांगितले आहेत. ते पुढील प्रमाणे**

**वाढत्या वयाची लक्षणे थांबवण्यासाठी**

वय वाढायला लागलं की त्याच्या खुणा चेहऱ्यावर आपोआप दिसू लागतात. त्यामुळे अनेक वेळा तरुणी किंवा महिला प्रसाधनांचा वापर करून वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचा प्रयत्न करतात. मात्र आपल्या आहारात समावेश केलेल्या पदार्थांमुळेदेखील ही समस्या टाळता येऊ शकते. रोजच्या जेवणामध्ये वापरण्यात येणाऱ्या मसाल्यामध्ये चक्रीफूल हे महत्त्वाचं काम करत असतं. चक्रीफूल वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचं काम करतं. यामध्ये व्हिटॅमिन 'ए' आणि 'सी'चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असते. त्यासोबतच त्यात अँटीऑक्सिडंटचे गुणही असतात. चक्रीफुलामध्ये शरीरातील फ्री रॅडिकल्सला नियंत्रणात आणण्याची क्षमता असते. त्यामुळे वाढत्या वयाची लक्षणं रोखण्याचं काम चक्रीफूल करते.



**सर्दी-खोकल्यावर गुणकारी**

कोणत्याही ऋतूमध्ये होणारा आजार म्हणजे सर्दी आणि खोकला. काही जणांना थंड पदार्थांचं सेवन केल्यानंतर लगेच सर्दी-खोकल्याची समस्या निर्माण होते. अशावेळी चक्रीफूल हे फायदेशीर ठरते. चक्रीफुलामध्ये थाइमो आणि एथोल याचे गुणधर्म असतात. त्यामुळे सर्दी किंवा खोकल्यावर चक्रीफूल गुणकारी आहे. त्यासोबतच शरीरामध्ये उष्णता वाढवण्याचं काम चक्रीफूल करते.

**पचनक्रिया सुधारते**

उशिरा जेवण झाल्यामुळे किंवा एखाद्या वेळी चुकीचे पदार्थ खाल्ल्यामुळे अनेक वेळा अपचन, पोटात गॅस होणे, पोटदुखी या सारख्या समस्या निर्माण होतात. मात्र या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी चक्रीफूल फायदेशीर ठरते. चक्रीफुलामुळे पचनक्रिया सुधारते. त्यामुळे आपल्या आहारात चक्रीफुलाचा समावेश करायला हवा.

## पुरोगामी महाराष्ट्रात कोवळ्या मुलींच्या विक्रीचा बाजार

# ५० ते ८० हजारांत कोवळ्या मुलींची सौदा

**■पालघर। प्रतिनिधी,**

पुरोगामी महाराष्ट्राचा डांगोरा पिटणाऱ्या महाराष्ट्रात आतमध्ये काय चाललंय याची कल्पना बहुतेक कुणालाच नाहीये. शाहू, फुले, आंबेडकरांनी ज्या महाराष्ट्राची समाजमनाची पुरोगामित्वाची मशागत केली त्या जमिनीत आता पुन्हा सरंजामीपणाचं पीक येऊ लागलंय. महाराष्ट्राच्या समाजमनाला हादरवून टाकणारी बातमी झी २४ तास जगासमोर आणलीय. महाराष्ट्रातील एक भयाण वास्तव सांगणारी ही बातमी आहे.

एका व्यक्तीच्या हातातील पैशातून काही जमीन किंवा कुठल्या वस्तूच्या खरेदी कर. तर एका १४ वर्षीय मुलीच्या सौद्यासाठी दिले जात आहेत. खेळायच्या, बागडायच्या आणि शाळेत जायच्या दिवसात या मुलींना चक्क काही हजारात विकत घेतलं जातंय, हे अंगावर शहारे आणणारं वास्तव आहे पालघर जिल्ह्यातलं, तुम्हाला प्रश्न पडला असेल, या अल्पवयीन मुलीची खरेदी कशासाठी केली जातेय.. ? यामागंच कारणही तेवढंच धक्कादायक आहे.

सध्या लग्नासाठी मुलांना मुली भेट नाहीयेत, खासगी नोकरी करणा-या तरूणांनाचंही सहजासहजी लग्न होत नाही, एकतर मुलगा सरकारी नोकरीला हवा किंवा खासगी कंपनीत त्याचं पॅकेज १५ किंवा २० लाखांचं हवं, हे झालं नोकरीवाल्या तरूणांचं. मात्र, नोकरी नसणा-या तरूणांनी काय करायचं? त्यांची लग्न कशी व्हायचीत? त्यासाठी काही एजंट पालघरच्या आदिवासी भागात ॲक्टिव्ह आहेत. जे नवरामुलाकडून लाखो रुपए घेतात आणि पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील कुटुंबाना केवळ हजारो रुपए देऊन त्यांच्या मुलींचा सौदा करतात.. तुमच्या मुली सुखात संसार करतील मुलगा नोकरी करतो अशी अमिषं दाखवून अशिक्षित वाड्या-वस्त्यावरील आदिवासी कुटुंबाची सर्रासपणे फसवणूक केली जातेय.




वाडा-भिवंडी भागातल्या आदिवासी पाड्यांवर कोवळ्या मुलींची लग्नासाठी विक्री होत असल्याची माहिती मिळाली. पालघर आणि तिथून वाडा तालुक्यात पोहोचलो. शहरातील गगनचुंबी इमारती मागं टाकून पालघरमधील आदिवासी भागात पोहोचलो. रस्त्याच्या दुतर्फा गर्द झाडी दिसू लागली होती. मध्ये मध्ये पाच-दहा झोपड्यांच्या आदिवासींच्या वाड्या दिसू लागल्या. तिथल्या आदिवासी बहुल परळी गावात पोहोचलो.

बहुतेक गावचा बाजार असावा. बाजार मागं सोडून आम्ही तिथल्या आदिवासी पाड्यावर गेलो.ती झोपडी होती पीडीत मुलीची झोपडी म्हणजे शब्दशः झोपडी गवताच्या भींती. गवताचं छप्पर. घरात चार भांडीकुंडी आणि एका बाबूंच्या आडव्या काठीवर टाकलेले कपडे... पीडित मुलगी जेमतेम १४ ते १५ वर्षांची असेल... तिच्याजवळ दोन वर्षांची मुलगी होती... पाहणा-या कुणालाही वाटेल पीडित मुलीची ती बहीण असावी... पण तसं नव्हतं...ती १५ वर्षांची मुलगी त्या चिमुरडीची आई होती.. जवळपास तीन वर्ष त्या मुलीनं नरकयातना भोगल्या होता. ही पीडित मुलगी तिच्या आजीच्या घरी राहायला होती...आईवडील कायम वीटभट्टीवर कामाच्या निमित्तानं गावापासून दूर होते... एकदिवस गावातला कोर नावाचा दलाल तिच्या आजीकडं आला... आजीला काय सांगितलं माहिती नाही. दरम्यानच्या काळात पीडितेची आजी वारली...तरीही कोर नावाच्या दलालानं तिला घेऊन संगमनेर गाठलं...कारण कोरनं या मुलीचा सौदा केला होता. हा सौदा केला होता ५० हजारांत... अवघ्या ५० हजारांत या कोवळ्या मुलीची विक्री झाली होती.

पीडित मुलीला याची कल्पनाही नव्हती..लग्न ठरवायला लावलंय याची कल्पना तिला आली होती. आहिल्यानगरच्या संगमनेर गावात पीडित मुलीला घेऊन गेले.आधी हळदी कुंकू करु असं सांगितलं आणि एका बेसावध क्षणी लग्न लावून दिलं.

आपली मुलगी आयुष्यभर सुखात राहील, जे सुख आपण आर्थिक परिस्थितीमुळे देऊ शकलो नाही ते लग्नानंतर मिळेल या भ्रमात राहून आई-वडील एजंटच्या अमिषाला बळी पडतात. पण त्यांना काय माहित, मिळालेल्या पैशांच्या बदल्यात त्यांच्या चिमुकलीच्या नशिबात फक्त आणि फक्त छळच लिहिलेला असेल... जव्हार तालुक्यात एका आदिवासी कुटुंबासोबत असाच धक्कादायक प्रकार घडलाय.

१४ वर्षाची नीलम एका एजंटमार्फत जळगावच्या सचिन पाटीलसोबत त्र्यंबकेश्वरमध्ये तिचं लग्न लावण्यात आलं. लग्नानंतर नीलम गरोदर राहिली.. मात्र, तिच्या सासरच्यांनी गर्भपात करून नीलमला तिच्या माहेरी पाठवून दिलं.

पालघरच्या आदिवासी भागात एजंटमार्फत अनेक मुलींचा सौदा केला जातो.एजंट लाखो रुपए घेऊन आदिवासी समाजातील मुलींची लग्न लावून देतात. मात्र, नंतर त्यांचं काय होतं? त्या कशा राहतात याकडे ढुंकूनही बघत नाहीत. पालघर जिल्ह्याच्या आदिवासी भागातील भीषण परिस्थितीमुळे इथली कुटुंबं आपल्या मुलींची केवळ ४० ते ५० हजारांसाठी लग्न लावून देतात. आपली मुलगी कोणाला देतोय? तो कुठे राहतो? याची साधी कल्पना देखील त्यांना नसते. या दोन्हीही प्रकरणात पोलिसांनी कारवाई केली असून चार्जशीट दाखल केलीय, आरोपींसह एजंटलाही पोलिसानी बेड्या ठोकल्या आहेत.

मात्र, आदिवासीबहुल या भागातल्या वाडा, मोखाडा, जव्हार, भिवंडीत अशी अनेक प्रकरणं आहेत. ज्यात अल्पवयीन मुलींची लग्न करून त्यांचा सौदा केला जातोय.देशाची आर्थिक राजधानी मुंबईपासून अवघ्या शंभर किलोमीटरच्या परिसरात पालघर आणि ठाण्याचा आदिवासी भाग आहे. या आदिवासी भागाला अनेक समस्यांनी ग्रासलंय. बालमृत्यू आणि कुपोषण इथल्या आदिवासींच्या पाचवीला पुजलंय. आईच्या पोटात असल्यापासून इथल्या आदिवासींच्या वाट्याला संघर्ष येतो. जन्मताच जगण्याचा संघर्ष... तिथंही मृत्यूला हुलकावणी दिली की कुपोषणाचा विळखा पडतो. त्यावरही मात केली की इथल्या आदिवासी मुलींचा चक्क सौदा मांडला जातो.

**दोषींवर कठोर कारवाई करू - गृहराज्यमंत्री योगेश कदम**

**पालघरमधील आदिवासी भागात मुलींच्या विक्रीचं रॅकेट उघडकीस आणल्यावर गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी यावर सरकार तात्काळ दखल घेईल असं म्हंटलं आहे. सदर प्रकरणाची चौकशी होईल आणि दोषींवर कठोर कारवाई करू असं त्यांनी म्हटलं आहे.**

**आदिवासी विकास मंत्र्यांनी प्रकरण गांभिर्याने घेतलंय - राधाकृष्ण विखे पाटील**

**महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सुद्धा या प्रकरणी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सांगितलं की, आपल्या माध्यमातून प्रकरण समजतंय. आदिवासी विकास मंत्र्यांनी प्रकरण गांभियार्ने घेतले आहे. नविन सामाजिक विषय समोर आलेला आहे. अमरावतीचा पालकमंत्री असताना फॉरेन फंडिंग एनजीओ आलेल्या आहेत. त्यांच्याकडून शोषण होते. असा माझा आरोप होता. आदिवासी बांधवांचा फसवणूक होतंय. एनजीओ आहेत या आदिवासी लोकांच्या विकासात अडथळा आहेत. असं जर प्रकरण असेल तर ते खूप गंभीर आहे.मीही आदिवासी विकास मंत्र्यांशी बोलेनच. शिवाय मुख्यमंत्री संवेदनशील आहेत, तेही लक्ष घालतील'.**

**मुलींचं संरक्षण करण्यात राज्य अपयशी - नाना पटोले, काँग्रेस नेते**

**काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी सुद्धा पालघरमधील आदिवासी भागात मुलींच्या विक्रीचं रॅकेट उघडकीस आल्यावर सरकारवर घणाघात केला. 'हे सरकार इतकं निद्रावस्थेत आणि राज्य विकणे मध्ये आहे. मुलींचं संरक्षण करण्यात राज्य अपयशी ठरले आहे. ‘झी २४ तास’ने पालघरच्या प्रकरणाचा पर्दाफाश केल्यानंतर आता तरी सरकारचे डोळे उघडले पाहिजे. विधानसभेत आम्ही हा विषय उपस्थित करू' असं नाना पटोले यांनी म्हटले.**

**याप्रकरणी कुणालाही सोडणार नाही - गिरीश महाजन**


**मंत्री गिरीश महाजन यांनी सुद्धा पालघरमधील आदिवासी भागात मुलींच्या विक्रीचं रॅकेट हे हे अतिशय गंभीर आहे. माझं मन सुन्न होतंय. याप्रकरणी कुणालाही सोडणार नाही. असं आश्वासन त्यांनी दिलंय.**

## मुंबई ते पुणे प्रवास फक्त दीड तासांत होणार

### नवीन एक्स्प्रेसवे बांधणार... नितीन गडकरींची महाराष्ट्रासाठी मोठी घोषणा

**■ बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज महत्त्वाची घोषणा केली आहे. २०२६ साठी महाराष्ट्रातील रस्ते बांधणीसाठी १.५० लाख कोटींची कामे मंजूर करण्यात आली आहेत. पुढच्या तीन महिन्यात या रस्त्यांचे काम सुरू होणार असल्याचीही माहिती मिळत आहे. शनिवारी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधीशी बोलताना नितीन गडकरी यांनी ही माहिती दिली आहे.




नितीन गडकरी यांनी प्रसारमाध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, एमएसआयडीसी (महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ) १६,३१८ कोटी रुपयांचा निधी खर्च करुन पुणे संभाजीनगर नवीन द्रुतगती महामागार्ची बांधणी करणार असून त्यासाठी सामंजस्य करारावर प्रक्रियादेखील करण्यात आली आहे. या नवीन महामागार्मुळं पुणे ते छत्रपती संभाजीनगर प्रवासाचा वेळ दोन तासांनी कमी होणार आहे. तर, छत्रपती संभाजीनगर ते नागपूर प्रवासाचा वेळ अडीच तासांनी कमी होणार आहे.

नितीन गडकरी यांनी पुढे म्हटलं आहे की, ४,२०७ कोटी रुपये खर्चून बांधल्या जाणाऱ्या तळेगाव-चाकण-शिरूर उन्नत मागार्चे भूमिपूजन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपल्यानंतर केले जाईल. तसंच, ते पुढे म्हणाले की, पुणे विभागासाठी ५०,००० कोटी रुपयांच्या रस्ते कामांना मंजुरी देण्यात आली असून पुढील तीन महिन्यांत बांधकामाला सुरुवात होईल.

सध्याच्या पुणे-मुंबई द्रुतगती मागार्ला समांतर असा नवीन द्रुतगती मार्ग बांधला जात आहे. अटल ब्रीजवरून येत जेएनपीटीकडे गेलो की ग्रीनफिल्ड लिंक अटल सेतू-जेनएपीटी चौक ते पुणे-शिवार जंक्शन असा पुणे-बेंगळुरू एक्सप्रेस हायवेचा १३० किलोमीटरचा भाग आहे. या मागार्साठी अंदाजे खर्च १५,००० कोटी रुपये आहे. या नवीन महामागार्मुळं दोन्ही शहरांमधील वेळ दीड तासांवर येईल. तर, मुंबई-पुणे-बेंगळुरू प्रवासाचा वेळ साडेपाच तासांवर येईल. पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेला एक सामायिक एक्सप्रेस हायवे आपण तयार करत आहोत.

नागपूर-काटोल सेक्शन हा नऊ किलोमीटरचा मार्ग, काटोल बायपास, जाम बायपास, २ हजार कोटींचा नागपूर-भंडारा सहापदरी मार्ग मंजूर करण्यात आला आहे. मराठवाड्यातील चाळीसगाव ते छत्रपती संभाजीनगरदरम्यान २ हजार ८०० कोटींचा नवीन मार्ग तयार होईल. १,०७४ कोटींचा तळोदा ते शहादा चारपदरी मार्ग, १ हजार २४५ कोटींचा तळोदा ते यावल चारपदरी मार्ग, तळोदा ते रावेरपर्यंत १४०० कोटींचा मार्ग होणार आहे.

याव्यतिरिक्त सीआरएफ आणि ॲन्युअल प्लानमध्ये ६० हजार कोटींच्या कामांना मंजुरी दिली आहे. त्यातील २० हजार कोटींची कामे प्रगतीपथावर आहेत, असंही नितीन गडकरी म्हणाले.




महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ म्हणजे एमएसआरडीसीने हा द्रुतगती महामार्ग प्रस्तावित केला असून ४४२ किमी लांबीचा हा महामार्ग आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महामागार्ला मंजुरी दिल्यानंतर या महामार्गाच्या कामाला गती येणार आहे. या महामार्गामुळं मुंबईहून लातूरला पोहोचणे सोप्पे होणार असून दळणवळणाबरोबरच आर्थिक व्यवस्थेलाही बळकटी येईल.

## महाराष्ट्रात आणखी एक महामार्ग बांधणार...

# ११ तासांचा प्रवास ५ तासांवर येणार, ५ जिल्हे जोडणार

**■मुंबई । प्रतिनिधी,**

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात नवीन प्रकल्पाची कामे हाती घेण्यात आली आहे. त्यातीलच एक काम म्हणजे रस्ते बांधणीचे काम. राज्यात विविध जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात महामार्गाचे जाळे उभारण्यात येत आहेत. अशातच देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठी घोषणा केली आहे. हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी फडणवीसांनी लातूर-कल्याण महामार्गाबाबत माहिती दिली आहे.

लातूर ते कल्याण हे अंतर ११ तासांचे आहे. मात्र या नवीन महामागार्मुळं प्रवास थेट ४.३० ते ५ तासांवर येणार आहे. तसंच, या महामार्गामुळं अनेक शहरं जवळ येणार आहेत. कल्याणच्या पुढेही या महामागार्ला कनेक्टिव्हीटी देण्यात आली असून त्यामुळं अटल सेतूमार्गे थेट मुंबईत पोहोचणे शक्य होणार आहे. हा महामार्ग मराठवाड्यासाठी गेमचेंजर असणार आहे.

लातूर ते कल्याण महामार्गासाठी ३६ हजार कोटींचा खर्च येणार आहे. तसंच. या महामागार्मुळं ठाणे, पुणे, बीड, अहिल्यानगर व लातूर हे जोडले जाणार आहेत. हा महामार्ग कल्याणनंतर माळशेज घाटमार्गे बदलापूर वडोदरा एक्स्प्रेसवे वरील बोगद्यातून १५ मिनिटांत अटल सेतूवर पोहोचतो. त्यामुळं अगदी २० मिनिटांत मुंबई गाठता येईल.

तसंच, पुढे वाढवण बंदर आणि नवी मुंबई विमानतळदेखील गाठता येणार आहे. तसंच, लातूरवरुन पुढे महाराष्ट्र कर्नाटक सीमेजवळ हा माहामार्ग संपणार आहे. म्हणजेच या महामार्गामुळं कर्नाटकात जाणंदेखील सोप्पे होणार आहे. तसंच, विरार-अलिबाग कॉरिडोरलादेखील जोडला जाणार आहे.

## कराड अपघातप्रकरणी पीडित कुटुंबाला १ कोटीची भरपाई... लोकन्यायालयात ऐतिहासिक तडजोड

**■कराड। प्रतिनिधी,**

कराड येथे घडलेल्या गंभीर मोटार वाहन अपघात प्रकरणात लोकन्यायालयाच्या माध्यमातून पीडित अर्जदार मोहन मारुती शेवाळे व त्यांच्या कुटुंबीयांना तब्बल १ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली. दोन्ही पक्षकारांमध्ये परस्पर सहकार्याने झालेल्या सामंजस्यपूर्ण चर्चेनंतर ही तडजोड पूर्ण झाली असून लोकन्यायालयाने त्यावर आपल्या निर्णयाची मोहोर उमटविली.




एखाद्या अपघातप्रकरणी इतकी भरीव आर्थिक नुकसानभरपाई मिळण्याची ही अनेक वर्षानंतरची दुर्मिळ घटना मानली जात आहे. या भरघोस विमा रकमेच्या मंजुरीमुळे पीडित कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

न्यायालयात खऱ्या अर्थाने न्याय मिळतो, याचा आज अनुभव आला, अशी भावना पीडित अर्जदारांनी व्यक्त केली. एकाच प्रकरणात १ कोटी रुपयांची अपघात भरपाई मंजूर होणे, ही घटना कराड लोकन्यायालयाच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरली असून लोकन्यायालयाच्या प्रभावी भूमिकेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

या प्रकरणात जिल्हा न्यायाधीश यू. एल. जोशी व डी. बी. पतंगे, तसेच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. एस. बी. गोवेकर यांनी प्रभावी मध्यस्थीची भूमिका बजावली. अर्जदारांच्या वतीने ॲड. निरज फिरंगे, ॲड. अजिंक्य डुबल, ॲड. मच्छिंद्र पवार, ॲड. यशवंतदत्त बेंद्रे व ॲड. ऋषिकेश यादव यांनी बाजू मांडली, तर विमा कंपनीकडून ॲड. एस. एस. फडतरे यांनी काम पाहिले.

हा निकाल मोटार अपघात दाव्यांबाबत लोकन्यायालय हे वेगवान, परिणामकारक व न्याय्य पर्याय ठरू शकते, याचे ठोस उदाहरण मानले जात असून कायदेशीर व सामाजिक क्षेत्रातून या निर्णयाचे स्वागत होत आहे.

**संवेदनशील न्यायदानाचा अनुभव**

यावेळी संबंधित कुटुंबीयांचे अश्रू अनावर झाले असून संपूर्ण वातावरण भावूक झाले होते. जिल्हा न्यायाधीश यू. एल. जोशी यांनी स्वतः पुढाकार घेत कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. यापुढील आयुष्य सकारात्मकतेने व धैर्याने जगा, असा प्रेमळ सल्लाही त्यांनी दिला. न्यायदान करताना गंभीर व कठोर भासणाऱ्या न्यायाधीशांचे हे संवेदनशील रूप उपस्थितांच्या मनाला भावून गेले.

## ठाण्यात पत्नीसोबत सतत वाद, शेवटी मित्रांना सांगून विषारी साप आणला अन्...

**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाण्यातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. एका महिलेच्या हत्येप्रकरणी चार आरोपींना अटक केल्याचं सांगितलं जात आहे. जवळपास तीन वर्षांपूर्वी संबंधित महिलेची हत्या करण्यात आली असून अखेर, पोलिसांनी या घटनेतील आरोपींना अटक केल्याची माहिती आहे. आरोपींमध्ये पीडितेच्या पतीसह चार लोकांचा समावेश आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, महिलेची हत्या कोणत्याही सामान्य पद्धतीने नव्हे तर तिला विषारी साप चावल्याने झाली होती.

**पोलिसांचा संशय बळावला अन्...**

मिळालेल्या माहितीनुसार, १० जुलै २०२२ रोजी नीरजा रूपेश आंबेकर नावाच्या एका महिलेचा बदलापूर पूर्व येथे उज्वलदीप सोसायटीमधील घरात मृत्यू झाला. त्यावेळी, महिलेचा आकस्मित मृत्यू समजून गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुरूवातीच्या तपासात, या प्रकरणासंबंधी कोणावर संशय निर्माण झाला नाही. मात्र, कालांतराने काही साक्षीदारांच्या जबाबातील विरोधाभास समोर आले आणि पोलिसांनी पुन्हा या प्रकरणाचा सखोल तपास करण्यास सुरूवात केली.

**पत्नीसोबतच्या वादातून हत्येचं प्लॅनिंग**

प्रकरणाच्या तपासादरम्यान, मृत महिलेचे तिच्या ४० वर्षीय पती रूपेश आंबेकरसोबत सतत कौटुंबिक वाद होत असल्याचं समोर आलं. पत्नीसोबत सतत वाद होत असल्याकारणाने त्याने पीडितेचा कायमचा काटा काढण्याचं ठरवलं. या कटात, आरोपीसोबत रिशिकेश रमेश चालके आणि कुणाल विश्वनाथ चौधरी या त्याच्या मित्रांचा समावेश होता.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी चेतन विजय दुधाणे (३६) नावाच्या सर्प बचाव स्वयंसेवकाशी संपर्क साधला, आरोपीच्या सांगण्यावरून नीरजाच्या हत्येसाठी चेतन त्यांच्यासाठी एक विषारी साप घेऊन आला. ठरल्याप्रमाणे, नीरजाला त्याच सापाने चावले आणि त्यातच तिचा मृत्यू झाला. आरोपींना वाटलं की सर्पदंशामुळे झालेला मृत्यू नैसर्गिक किंवा अपघाती मानला जाईल आणि या हत्येच्या प्रकरणातून त्यांची सुटका होईल.

**पोलिसांनी दिली माहिती**

पोलिसांचा तपास आणि टेक्निकल पुराव्यांच्या आधारे, या हत्येच्या प्रकरणातील सत्य घटना उघडकीस आली. आता, तीन वर्षांनंतर पोलिसांनी महिलेचा खून केल्याप्रकरणी पतीसह चार आरोपींविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला असून त्यांना अटक करण्यात आल्याची माहिती आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी नितीन पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित प्रकरणाचा अधिक तपास केला जात असून आरोपींची देखील कठोर चौकशी केला जात आहे.




## १०च्या विद्यार्थ्याला आवडू लागली ८ची मुलगी, अन्...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

सहा महिन्यांपूर्वी फिरोजाबादमध्ये इयत्ता दहावीत शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्यानें एका मुलीला डीजेवर नाचताना पाहिले. ती मुलगी इयत्ता आठवीत शिक्षण घेत होती. तिचा नाच पाहून मुलगा तिच्या प्रेमात पडला. त्यांची मैत्री झाली आणि नंतर मैत्रीचे नात्यात रुपांतर झाले हे दोघांनाही कळाले नाही. ते रोज एकमेकांसोबत बोलू लागले होते. दरम्यान, त्या मुलाने मुलीचे आक्षेपार्ह स्थितीत फोटो काढण्यात आले.

मुलाने आपल्या प्रेयसीला इंटिमेट सीन दाखवून अनेकदा ब्लॅकमेल केलं होतं. हे सर्व ऐकताच तिच्या पायाखालची जमीन सरकली आणि तिला भिती वाटू लागली होती. आरोपीने तिला काहीतरी वस्तू चोरण्यास सांगितली होती, हे ऐकून मुलीने आपल्या आईकडून तब्बल दीड लाख रुपयांहून अधिक किंमतीचे सोन्याचे दागिने चोरले आणि ते मुलाला दिले.

दागिन्यांची चोरी केल्यानंतर कुटुंबाला संशय आला आणि त्यांनी आपल्या मुलीची चौकशी केली. तेव्हाच त्यांना कळले तिने चोरीचे दागिने घेतले होते आणि नंतर तिने तरुणाला दिले होते. गुन्हे दाखल झाल्यानंतर आरोपी मुलाला लगेच अटक करण्यात आली. त्याच्याकडून दागिनेही जप्त करण्यात आले.

या प्रकरणात, अतिरिक्त पोलीस अधीक्षक शिवशंकर प्रसाद म्हणतात की, आरोपी मुलाची कसून चौकशी केली जात असून कुटुंबातील सदस्यांना आणि पालकांना त्यांच्या मुलांच्या मोबाईलवरील हालचालींवर आणि त्यांच्या मित्रांवर कडक नजर ठेवण्याची विनंती केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com